१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार १८ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४४, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 44 Marathi - Daily - Mumbai, 18 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

महिला आरक्षण: हक्क की फसवणूक?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


## भोंदू खरात प्रकरणातील साक्षीदार डॉ. शेळके व पत्नीचा अपघाती मृत्यू



**भोंदू अशोक खरात प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार आणि शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. जितेंद्र शेळके यांचा आज समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात मृत्यू झाला. या घटनेत त्यांच्या पत्नी अनुराधा शेळके यांचाही जागीच मृत्यू झाला असून मुलगा गंभीर जखमी आहे. खरात प्रकरणात शेळके हे महत्त्वाचे साक्षीदार असल्याने हा मृत्यू अपघात की घातपात? याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत.**

■ छत्रपती संभाजीनगर

**डॉ. शेळके** हे आज दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीकडे निघाले होते. दीड तासाने समृद्धी महामार्गावर धोत्रे गावाजवळ त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार थेट कंटेनरखाली घुसली आणि तिचा चुराडा झाला. अपघातानंतर » पान ७ वर

# महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर

## मोदी सरकारला पहिला धक्का! अन्य दोन विधेयकेही मागे

**महिला आरक्षणासाठीचे घटनादुरुस्ती विधेयक आज लोकसभेत नामंजूर झाले. या विधेयकावर एकूण ५२८ खासदारांनी मतदान केले. या विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते मिळाली. मात्र, दोन-तृतियांश बहुमताची आवश्यकता असल्याने विधेयक मंजूर होऊ शकले नाही. हे विधेयक फेटाळण्यात आल्यानंतर सरकारने मतदारसंघांची पुनर्रचना आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिला आरक्षण लागू करणे ही इतर दोन विधेयकेही मागे घेतली. ११ वर्षांच्या कार्यकाळात सभागृहात एखादे विधेयक मंजूर करून घेण्यात अपयशी ठरण्याची ही पहिलीच वेळ असल्याने मोदी सरकारसाठी हा मोठा धक्का आहे.**



■ नवी दिल्ली

**या सुधारित** विधेयकांवर लोकसभेत २१ तास चर्चा झाली. एकूण १३० खासदारांनी आपली मते मांडली, ज्यामध्ये ५६ महिला खासदारांचा समावेश होता. मतदान सुरू होण्यापूर्वी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात सरकारची बाजू मांडली. ते म्हणाले की, आज विरोधी पक्षांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले नाही, तर हे विधेयक नामंजूर होईल. मात्र आपल्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करणारे कोण आहे, हे देशातील महिलांना दिसेल. मोदी जे काही करत आहेत, त्याचे फायदे-तोटे न पाहता त्याला विरोध करायचा, असे विरोधी पक्षाने ठरवले आहे. देशातील माता,

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

भगिनींना आरक्षण मिळणार आहे. परंतु मोदींना याचे श्रेय मिळेल, म्हणून ते विधेयकाला विरोध करत आहेत. काँग्रेसने देशात महिलांना कधीच संधी दिली नाही.

### राहुल गांधींनी १६ आकड्याचे कोडे टाकले



राहुल गांधी यांनी आपले निवेदन करताना म्हटले की, काल पंतप्रधान भाषण करत असताना अत्यंत निस्तेज वाटले. त्यांच्यात उत्साहच वाटत नव्हता. हे भाषण ऐकत असताना मी मोबाईलमध्ये पाहिले तेव्हा मला १६ एप्रिल ही तारीख दिसली आणि मला एकदम उलगडा झाला. मी जे बोलतो आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक माहिती माझ्याकडे आहे हे लक्षात घ्या. मी मनात म्हटले की, बापरे १६ क्रमांक आहे. तुमच्या (सत्ताधारी) सर्व समस्यांचे उत्तर १६ क्रमांकात आहे. मी काय बोलतो आहे हे तुम्हाला कळले का? १६ तारखेचे महत्त्व ज्याला कळले असेल त्याने मला संदेश पाठवावा किंवा ट्विट करावे. राहुल गांधी यांच्या विधानामुळे १६ तारखेला काय झाले किंवा काय होऊ शकते यावरच चर्चा सुरू झाली आहे. अनेकांनी गुगल करून याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु १६ एप्रिल या दिवशी महत्त्वाची कोणतीच घटना घडलेली नसल्याने राहुल गांधी यांच्या वाक्याचे गूढ कायम राहिले आहे.

अमित शहा यांच्या आधी राहुल गांधी यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या निवेदनाची सुरुवात गोष्टी सांगत सुरू केली. लहानपणी आपल्या आजीने आपल्याला अंधारात उभे करून अंधाराला घाबरू नकोस. कारण यातच सत्य लपलेले असते, असा संदेश दिला असे ते म्हणाले. ते बालपणीच्या गोष्टी सांगू लागल्याने सभागृहात चलबिचल सुरू झाली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबाबत नाराजी व्यक्त करत विधेयकाबाबत बोला, असे वारंवार छेडले. त्यानंतर तर राहुल गांधी यांनी जादूगाराची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. जादूगार स्वत:भोवती साखळ्या गुंडाळून घेतो आणि मग त्यातच अडकून पडतो आणि त्याचे हसे होते ही गोष्ट सांगत त्यांनी जादूगाराची » पान ७ वर

## थोडक्यात

### वाल्मीक कराडची पुन्हा प्रकृती बिघडली

**बीड**- मस्स्जोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याची प्रकृती पुन्हा एकदा बिघडली आहे. त्याच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. १६ महिन्यांपासून वाल्मिक कराड हा बीड कारागृहात आहे. कराडला मधुमेह (शुगर) सह इतर आजारांचा त्रास असल्याची माहिती आहे. आजही प्रकृती अधिक खालावल्यानंतर त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या डॉक्टरांकडून त्याची सविस्तर तपासणी सुरू असून, अहवालानुसार पुढील उपचार केले जाणार आहेत.

### लक्ष्मी ऑर्गेनिक बंद करा ११ ग्रामपंचायतींचा ठराव

**रत्नागिरी** - जिल्ह्यातील लक्ष्मी ऑर्गेनिक केमिकल लिमिटेड या कंपनीविरोधातील आंदोलनाला जोर मिळत असून, स्थानिक ग्रामपंचायतींचा पाठिंबा वाढत आहे. कंपनी बंद करण्याच्या मागणीसाठी आतापर्यंत ११ ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर करून जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले, तर आणखी २६ ग्रामपंचायतींनी ठराव तयार केल्याची माहिती आहे. लक्ष्मी ऑर्गानिक विरोधातील आंदोलन तीव्र होत असताना कंपनीकडून गावोगावी जाऊन प्रसारमाध्यमांमधील बातम्या खोट्या असल्याचा दावा केला जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

## बळजबरी धर्मांतर हे दहशतवादी कृत्य घोषित करा! सुप्रीम कोर्टात याचिका

■ नवी दिल्ली

**बळजबरी** धर्मांतर करणे हे दहशतवादी कृत्य घोषित करा, अशी मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली. नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या नामवंत कंपनीमध्ये उघड झालेल्या बळजबरी धर्मांतराच्या प्रकरणावरून ॲड. अश्विनी कुमार उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे.

बळजबरी धर्मांतर हे योजनाबद्ध रितीने , संघटितपणे केले जाते तेव्हा ते कृत्य भारतीय न्याय संहितेच्या कलम ११३ अन्वये दहशतवादी कृत्य या व्याख्येमध्ये मोडते, असा दावा उपाध्याय य़ांनी याचिकेत केला



आहे. बळजबरी धर्मांतर करणे हे कृत्य केवळ सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, लोकशाही शासनव्यवस्था आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरच घाला घालत नाही, तर देशाची एकता आणि अखंडतेलाच तडा देणारे कृत्य आहे, असा युक्तिवादही उपाध्याय यांनी याचिकेद्वारे केला आहे. बळजबरी धर्मांतर रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे निर्देश सर्व राज्य सरकारांना द्यावेत, अशी विनंती उपाध्याय यांनी केली आहे. दरम्यान, टीसीएसमधील कथित लव्ह जिहादच्या विरोधात आज बजरंग दलाच्या वतीने देशव्यापी आंदोलन छेडण्यात आले. महाराष्ट्रात रत्नागिरी, पालघर, नवी मुंबई आणि मुंबई येथे » पान ७ वर

### निदा खानच्या जामीन अर्जावर आज सुनावणी

टीसीएस प्रकरणात आरोपी निदा खान हे प्रकरण उघडकीस आल्यापासून फरार आहे. तिने अटकेपासून वाचण्यासाठी न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज केला आहे. या अर्जावर उद्या सुनावणी होणार आहे. निदा खान पोलिसांच्या हाती लागली नसली तरी तिचे लोकेशन सापडल्याचा दावा करण्यात येत आहे. तपास यंत्रणांच्या मते ती मुंबईतील भिवंडीत लपलेली आहे. अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी तिने आपण गर्भवती असल्याचे कारण दिले आहे. निदाच्या पतीला आज पोलिसांनी अटक केली. सध्या त्याची चौकशी चालू आहे.

## राज ठाकरेंची महापालिकेत आयुक्त अश्विनी भिडेंची भेट

■ मुंबई

**मनसे** अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबई महानगरपालिकेला भेट देत नव्या महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

महापालिका आयुक्तांची नियुक्ती झाल्यानंतर राज ठाकरे हे नेहमीच सदिच्छा भेट देतात. याच परंपरेनुसार त्यांनी यावेळीही अश्विनी भिडे यांची भेट घेतली. यावेळी मनसेचे नेते आणि पदाधिकारीही उपस्थित होते. ही भेट औपचारिक स्वरूपाची असली, तरी मुंबईतील विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भिडे यांच्या भेटीनंतर राज ठाकरे यांनी मनसे व उबाठाच्या पालिका कार्यालयालाही भेट दिली. यावेळी नगरसेवकांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी नगरसेवकांशी संवाद साधला.



## अनिल अंबानी समूहातील अमिताभ झुनझुनवाला, अमित बाफना यांना ५ दिवसांची ईडी कोठडी

■ मुंबई

**ईडीने** अनिल धीरुभाई अंबानी समूहाच्या माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी अमिताभ झुनझुनवाला आणि अमित बाफना यांना अटक केली आहे. रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड यांच्या कर्ज वितरणातील कथित अनियमिततांशी संबंधित मनी लॉन्डरिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली. दोघांनाही मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत अटक करण्यात आली असून दिल्लीतील राऊज अव्हेन्यू येथील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असता दोघांना ५ दिवसांच्या ईडी कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. रिलायन्सने मात्र निवेदन जारी करून या दोघांनी पूर्वीच कंपनी सोडली असल्याने त्यांचा काहीच संबंध नाही असा खुलासा केला आहे.

ईडीने न्यायालयात सांगितले की, हे प्रकरण पूर्वनियोजित कट आहे, त्यामध्ये कॉर्पोरेट कर्जाच्या नावाखाली स्थापन केलेल्या कथित बनावट कंपन्यांत निधी वळवला. या व्यवहारांमुळे बँका, वित्तीय संस्था, भागधारक आणि गुंतवणुकदारांना नुकसान झाले असल्याचा आरोप करण्यात आला. बँक नोंदींमधून अनेक घटकांचा समावेश असलेली गुंतागुंतीची व्यवहार साखळी समोर आली » पान ७ वर

## देशात मतदान सक्ती नाही मागणी याचिका कोर्टाने फेटाळली

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने भारतात मतदान सक्तीचे करण्याची मागणी करणारी जनहित याचिका फेटाळली आहे.न्यायपालिकेकडून असा आदेश देणे शक्य नाही,याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाचा आहे,असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. अजय गोयल यांनी ही जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने देशात सक्तीच्या मतदानाची मागणी करणारी याचिका ऐकण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटले की, असा आदेश धोरणाच्या कक्षेत येतो आणि तो न्यायपालिकेकडून जारी केला जाऊ शकत नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. विपुल एम.पंचोली यांचा समावेश असलेल्या » पान ७ वर

## राज्यातील १७ लाख कर्मचारी २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर

■ मुंबई

**राज्यातील** १७ लाख शिक्षक-कर्मचारी-निमसरकारी कर्मचारी विविध मागण्यांवरून असलेला आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी मंगळवार २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय कर्मचारी संघटनांनी घेतला आहे. या संपामुळे राज्यातील प्रशासकीय कारभार ठप्प होणार असला तरी त्याची सर्व जबाबदारी सरकारची असेल, असे समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले. प्रलंबित मागण्यांबाबत संघटनेने वेळोवेळी एकूण ७ राज्यस्तरीय लक्षवेधी आंदोलने केली चर्चेची संधी द्यावी म्हणून अनेक वेळा पत्रव्यवहार केला. परंतु सरकारने याबाबत कमालीची उदासिनता दाखविली आहे. त्यामुळे राज्यभरातील कर्मचारी-शिक्षक संतप्त झाले आहेत. राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या समन्वय समितीने मुख्यमंत्र्यांना १८ मागण्यांची सनद पाठवली आहे. त्यात रिक्त पदे भरा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करा, प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्त्या द्या, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०:२०:३० ची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करा, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या अंशतः अनुदानित शाळेतील » पान ७ वर

## होर्मुझ सर्व व्यापारी जहाजांसाठी खुले लेबनॉन युद्धविरामानंतर इराणची घोषणा

■ तेहरान

**लेबनॉन** आणि इस्त्रायलमधील १० दिवसांच्या युद्धविरामानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे खुली केली. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली.

अब्बास अराघची यांनी म्हटले की, लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू असेल, तोपर्यंत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा प्रवास करता येईल. हा मार्ग खुला केला असला तरी इराणने काही सुरक्षा निर्बंध कायम ठेवले आहेत. जहाजांना केवळ इराणने



आखून दिलेल्या मार्गावरूनच प्रवास करावा लागणार आहे. अमेरिकेच्या पुढाकाराने लेबनॉन आणि इस्त्रायलमध्ये १० दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे. ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि लेबनॉनचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन यांच्याशी चर्चा केली. या पार्श्वभूमीवर पुढील ४ ते ५ दिवसांत दोन्ही देशांचे नेते व्हाईट हाऊसमध्ये एका बैठकीसाठी येणार आहेत.

## शरियत कायद्याला आव्हान सुप्रीम कोर्टाची केंद्राला नोटीस

■ नवी दिल्ली

**मुस्लिमांसाठी** लागू असलेला शरियत कायद्याला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. हा कायदा वारसा हक्क आणि मृत्युपत्राद्वारे वारसा हक्काबाबत महिलांवर अन्याय करणारा त्यांच्याशी भेदभाव करणारा आहे, असा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे.सर्वोच्च न्यायालयाने यावर केंद्र सरकारला नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. पौलमी शुक्ला यांनी ही याचिका दाखल केली असून त्यांच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण आणि ॲड निहाल अहमद हे युक्तिवाद करत आहेत. शरियत कायद्यातील वारसा हक्क आणि मृत्यूपत्राद्वारे मिळणारा वारसा हक्क याला घटनेच्या अनुच्छेद २५ अन्वये'आवश्यक धार्मिक परंपरा' असे म्हणता येत नाही, कारण भारतात मुस्लीम समाज शरियतच्या पलिकडे जाऊन विविध राज्यांत वैधानिक नियमांच्या चौकटीत राहण्यास बाध्य आहे अणि अनेक राज्यांच्या वैधानिक नियमांच्या चौकटीत शरियत कायद्यातील वारसा हक्काबाबतची तरतूद बसत नाही. हा कायदा मुस्लीम महिलांना समान न्याय देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला होता. मात्र दुर्दैवाने हा कायदाच आता मुस्लीम महिलांना वारसा हक्क मिळण्यामध्ये मोठा अडथळा ठरत आहे, असा युक्तिवाद ॲड. प्रशांत भूषण यांनी केला.




# सत्तेच्या अमरपट्ट्यासाठी मोदींचे प्रयत्न

**सध्या केंद्र सरकारने लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन ) महिला आरक्षण विधेयक याच्यामार्फत स्वत:कडे सत्तेचा अमरपट्टा राहील याची तरतूद करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असं दिसतंय. १३१ व्या घटना दुरुस्तीतून लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना आणि त्यातून महिलांना ३३% आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे, असं दाखवलं गेलं. आणि मग अचानक या विधेयकावर चर्चा सुरू असताना अचानक केंद्र सरकारने काल रात्री अधिसूचना काढून घोषित केलं की, २०२३ चं महिला आरक्षण विधेयक आजपासून लागू झालं आहे. जर यातील बदलांवर चर्चा सुरू आहे तर मग ही घाई कसली? केंद्र सरकारला नक्की काय साध्य करायचं आहे ?**



**- राज ठाकरे**

महिला आरक्षणाला आमचा अजिबात विरोध नाही, उलट महिलांना आरक्षण मिळतंय ही आनंदाची बाब आहे.

त्यामुळे आज या दुरुस्तीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह इतर राजकीय पक्ष जो विरोध करत आहेत तो काही महिला आरक्षणाला विरोध नाही हे समजून घ्यावं. मुळात महाराष्ट्राला महिला आरक्षण इत्यादी बाहेरच्यांनी शिकवू पण नये. कारण याच राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थात महिला आरक्षण आणलं.

आमचा विरोध हा लोकसंख्येनुसार लोकसभा मतदारसंघांच्या होणाऱ्या पुनर्रचनेला आहे. घटनेतील कलम ८१ आणि ८२ सांगतात की, लोकसभेतील जागा राज्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटल्या जातील. याचा सरळ अर्थ ज्या राज्यांनी शिक्षण, आरोग्य, महिलांचं सक्षमीकरण करून लोकसंख्या नियंत्रणात ठेवली त्यांच्या मेहनतीला शिक्षा आणि ज्यांनी वाट्टेल तशी लोकसंख्या वाढू दिली आणि संपूर्ण राज्यच्या राज्य बर्बाद केली त्या राज्यांचा संसदेतील टक्का वाढणार हा कुठला अजब न्याय ?

म्हणजे पश्चिम बंगाल असेल, पंजाब असेल, ओडिशा असेल किंवा ईशान्य भारतातील राज्य असतील किंवा महाराष्ट्र गोवा आणि दक्षिणेतील इतर राज्य असतील. या राज्यांमध्ये जिथे स्वतःची एक संस्कृती आहे, स्वतःची भाषा आहे, स्वतःची एक लिपी आहे आणि इथे अशा राज्यांचे हिंदीकरण करण्याचा प्रयत्न सुरू करणार हे नक्की.

मुळात उत्तरेच्या ३,४ राज्यातील लोकांनी गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ या राज्यात मोठ्या प्रमाणावर हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात तर या लोकांच्या मतपेढ्या, मतदारसंघ बनले आहेत. या प्रांतातून आलेले लोक इथे लोकप्रतिनिधी होत आहेत. बरं ते इथे निवडून आलेत म्हणून त्यांची या प्रांताबद्दल काही आस्था आहे असं नाही, त्यांचं लक्ष आपापल्या राज्यांकडे आहे. आज जी परिस्थिती महाराष्ट्रात आहे तीच गुजरातसकट दक्षिणेच्या इतर राज्यांमध्ये पण होणार हे नक्की. म्हणजे या राज्यांमध्ये हेच निवडून येणार आणि तिकडे पण हेच निवडून येणार... त्यात पुन्हा डिलिमिटेशन आयोग हा स्वायत्त असेल आणि ते मतदारसंघांची पुनर्रचना निष्पक्षपणे करतील अशी अपेक्षा बाळगणं पण चुकीचं आहे. मतदारसंघ फोडणे या विषयांत एकूणच महापालिका निवडणुकांमध्ये जे कौशल्य दाखवलं गेलं तसंच कौशल्य डिलिमिटेशन का दाखवणार नाही? तसंही आज देशात कुठल्याही आयोगाकडे निष्पक्षता आहे का? असो.

मुळात हा देश हे एक संघराज्य आहे याचं भान कुठे गेलं आहे? गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ या राज्यांचा प्रजनन दर हा त्यांनी २ च्या खाली आणण्यात यश मिळवलं आहे आणि उत्तरेच्या राज्यांचा प्रजनन दर हा ३ च्या आसपास आहे. म्हणजे ज्यांनी समजूतदारपणा दाखवला त्यांना शिक्षा? आणि गेल्या ७ दशकांत कोणतंही भान आलं नाही त्यांचा आवाज संसदेत मोठा असणार हा कुठला न्याय? बरं हे मोठ्या संख्येने संसदेत गेल्यावर काय करतील याचा अंदाज घ्यायचा असेल तर २०१० साली संसदेत समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलाने त्यावेळच्या महिला विधेयकाचा प्रस्ताव फाडला होता हे लक्षात घ्यावं लागेल.

सध्याच अशी परिस्थिती आहे की, महाराष्ट्राने जर केंद्राला कररूपात १ रुपया दिला तर राज्याला कसेबसे ३० ते ४० पैसे परत येतात, पण त्या उलट उत्तर प्रदेशने १ रुपया कररूपात दिला तर त्यांना उलट ३ रुपये आणि बिहारला चक्क ५ रुपये मिळतात. म्हणजे कराचा हिस्सा पण मिळणार नाही आणि आता तर महाराष्ट्र, गोवा सकट दक्षिणेतील पाचही राज्यांचा संसदेतील आवाज पण कमी होणार. हे खपवून घेतलं जाणार नाही.

आत्ताच हिंदी सक्तीच्या नावाखाली सरकारने काय काय प्रकार केले हे सगळ्यांनीच पाहिले. उद्या वाढलेल्या खासदारांच्या जोरावर या संपूर्ण देशाचं हिंदीकरण करतील. ही भीती सार्थ आहे. आणि म्हणूनच दक्षिणेतील राज्य याविरोधात एकवटली आहेत. या सगळ्यात गुजरात राज्यातील लोकप्रतिनिधींची काय भूमिका आहे हे माहीत नाही. सध्या नरेंद्र मोदी आणि अमित शहा आहेत म्हणून आपलं सुखनैव सुरू आहे असं जर गुजरातला वाटत असेल तर त्यांनी लक्षात ठेवावं, आज तुम्ही सुपात आहात पण म्हणून कायम सुपात असाल असं नाही, तुम्हीही कधी ना कधी जात्यात याल हे विसरू नका.

भारतीय जनता पक्ष हा गेली १० वर्षे पक्ष फोडत होता, आमदार, खासदार फोडत होता, राजकीय घरांमध्ये फूट पाडत होता, जातीच्या आणि धर्माच्या नावाखाली माथी भडकवत होता, पण आता यांची मजल देशात दोन गट पाडण्यापर्यंत गेली आहे. डिलिमिटेशनच्या नावाखाली स्वतःची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्ष जो प्रयत्न करत आहे, त्यांनी हा देश कायमचा दुभंगेल आणि राज्याराज्यांत स्वायत्ततेची मागणी सुरू होईल. एव्हढच नव्हे तर याचे परिणाम आपल्या संरक्षण आणि गृह विभागात देखील दिसून येतील! अवघ्या काही दशकांपूर्वी पंजाबमध्ये खलिस्तानच्या मागणीने काय रक्तरंजित संघर्ष उभा केला होता हे विसरू नका... जो असंतोष पंजाबमध्ये निर्माण झाला होता तसा असंतोष उद्या ईशान्य भारतातील राज्यांपासून ते दक्षिणेतील राज्यांमध्ये निर्माण झाला तर? आणि अशी परिस्थिती उद्भवली तर त्याला भारतीय जनता पक्षाची सत्तेची राक्षसी महत्त्वाकांक्षा जबाबदार असेल हे नक्की.

ज्या सरदार वल्लभभाई पटेलांच्या नावाने राजकारण करता आणि मतं मागता, त्या वल्लभभाईंना हा देश एकत्र आणताना काय संघर्ष करावा लागला होता हा इतिहास भाजपाच्या लक्षात असेल असं मी गृहीत धरतो. त्या संघर्षाला तुमच्या स्वार्थासाठी मातीमोल करू नका.

लोकसभेच्या जागा वाढवायच्या असतील तर त्या वाढवा जरूर, पण सध्याचा राज्यांचा जो कोटा आहे त्याला कुठेही धक्का नाही लागला पाहिजे. गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, गोवा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, केरळा, आसाम तसेच पूर्वेकडील राज्यांच्यासाठी किमान हमी जागा द्या आणि उरलेल्या लोकसंख्येनुसार जागांचे वाटप करा. सध्या केंद्र सरकार जे करत आहे तो एक प्रकारे आगीशी खेळ खेळत आहेत.

लोकसभा हा आकड्यांचा आखाडा बनवून त्यांना सत्तेत राहायचं आहे, पण त्यांना हे समजत नाहीये की, आज ना उद्या याने भारताच्या संघरचनेच्या पायालाच धक्का लागेल आणि त्यातून या देशात अराजकता माजायला वेळ सुद्धा लागणार नाही!

मी वर्तमानपत्रात वाचलं की, चंद्राबाबू नायडूंनी केंद्राच्या या प्रयत्नांना पाठिंबा घोषित केला आहे. माझी त्यांना पण विनंती आहे की, सत्तेचा भाग आहे म्हणून तुमची फरफट होऊ देऊ नका. आज तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन हे ठामपणे लढा देत आहेत, तशी अपेक्षा या देशातील सर्व स्वाभिमानी आणि ज्या राज्यांकडे स्वतःची सांस्कृतिक अस्मिता आहे अशा प्रत्येक राज्यातील राजकीय पक्षांकडून आहे. लक्षात ठेवा देशाची राजकीय संस्कृतीच बदलून टाकण्याचा प्रयत्न होत आहे, आणि एकदा का ती बदलली की, तुमच्या पायाखालची जमीन सरकली म्हणून समजा.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा महिला आरक्षणाला पाठिंबा आहे, पण त्याची ढाल करून जे काही उत्तरेत महत्त्व वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे त्याला स्पष्ट विरोध आहे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना याविरोधात वेळेस तीव्र आंदोलन उभं करेल हे नक्की.

## एसआरए कार्यालयाच्या जागेसाठी प्राधिकरणाचा ४० कोटींचा सौदा

■ मुंबई

**एसआरए** कार्यालयाच्या जागेसाठी प्राधिकरणाने वांद्रे (पूर्व) येथील एचडीआयएल या खासगी टॉवरमधील सहाव्या मजल्यावर असलेली साडेतेरा हजार चौरस फूट क्षेत्रफळाची जागा अंदाजे ४० कोटी रुपयांना विकत घेतल्याची माहिती समोर आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरए कार्यालयास प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांची गर्दी पाहता या कार्यालयात बसण्यासाठी कर्मचाऱ्यांना जागा अपुरी पडू लागली होती. त्यासाठी प्राधिकरणाने गेल्या दोन वर्षांपूर्वी शेजारी असलेल्या एचडीआयएल टॉवरमधील तिसऱ्या मजल्यावरील जागा एसआरएच्या कार्यालयीन कामकाजासाठी दरमहा अंदाजे ५० लाख रुपयांच्या भाडेपट्टीवर घेतली होती. अशी माहिती देऊन एक अधिकारी पुढे म्हणाला, अखेर प्राधिकरणाने भाडेपट्टीची कटकट संपविण्यासाठी येथील टॉवर मधील सहाव्या मजल्यावरील जागा विकत घेतली आहे. जागा मालकाशी आठवड्याभरात कायदेशीर करारनामा होणार आहे. या जागेत एसआरएचे १२ उपजिल्हा अधिकारी कामकाजासाठी बसणार आहेत.

## खोटी विधाने करून कोर्टाची दिशाभूल करणे महागात पडले

### याचिकाकर्त्याला १ लाखाचा दंड

■ मुंबई

खोटी विधाने करून आणि तथ्ये लपवून न्यायालयाची दिशाभूल करणे एका याचिकाकर्त्याला चांगलेच महागात पडले.

न्यायालयाची दिशाभूल करून अमूल्य वेळ वाया घालवल्याबद्दल याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारले आणि १ लाख रुपयांचा दंड ठोठावला. स्वच्छ हाताने न्यायालयाची पायरी न चढणाऱ्यांना दिलासा दिला जाऊच शकत नाही, असे न्या. फरहान दुभाष यांनी सुनावले आणि रोमेश शर्मा नावाच्या व्यक्तीची याचिका फेटाळून लावली. रोमेश शर्मा यांनी पाली हिल येथील एका मिळकतीबाबत



१९८७ मध्ये दावा दाखल केला होता. या दाव्यातील मूळ प्रतिवादी (नाथ सिंग चावला) यांचा १९९० मध्ये मृत्यू झाला होता. मात्र त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणण्यासाठी शर्मा यांनी २०१५ मध्ये अर्ज केला. या अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे. प्रतिवादीच्या निधनाची माहिती आपल्याला २०११-१२ मध्ये मिळाली, असे याचिकाकर्त्या रोमेश शर्मा यांनी म्हटले होते. त्यावर न्यायालयाने शंका घेतली आणि याचिकाकर्त्याला दंडाचा दणका दिला. न्यायमूर्ती दुभाष यांनी प्रकरणातील कागदपत्रांची पडताळणी केली असता धक्कादायक माहिती समोर आली.

## सहकारी बँकेचा माजी सेवकांसाठी आरोग्य आधार योजना लागू

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य सहकारी बँकेने माजी सेवकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी महत्त्वाचा निर्णय घेत माजी सेवक आरोग्य आधार योजना लागू केली आहे. या निर्णयाला काल झालेल्या प्रशासकीय सभेत मंजुरी देण्यात आली.

या योजनेअंतर्गत गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या पात्र माजी सेवकांना दरमहा ५,००० रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाणार आहे. ही मदत सेवक कल्याण निधीतून दिली जाणार असून, निवृत्तीनंतरच्या आर्थिक अडचणी कमी करण्याचा उद्देश आहे. वृद्धापकाळात कर्करोग, मूत्रपिंड निकामी होणे, मेंदूचा पक्षाघात, यकृत निकामी होणे, पार्किन्सन, क्षयरोग यांसारख्या आजारांवरील खर्चिक उपचार लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, शस्त्रक्रियेसाठी दिली जाणारी आर्थिक मदत पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी माजी सेवकांनी मुंबईतील मुख्य कार्यालय किंवा संबंधित विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन बँकेने केले आहे.

## फोर्ट परिसरातील ‘आराम’ हॉटेलच्या भवितव्याची चर्चा

### इमारतीचा ताबा रहेजा समूहाकडे

■ मुंबई

**सध्या** मुंबईतील फोर्ट परिसरात ऐतिहासिक कॅपिटल सिनेमा इमारतीत असलेल्या लोकप्रिय ‘आराम’ हॉटेलच्या भवितव्याची चर्चा सुरू झाली आहे. या इमारतीचा ताबा के. रहेजा समूहाकडे गेल्याने आता हे हॉटेल स्थलांतरित होणार का? असा प्रश्न उभा ठाकला आहे.

हे आराम हॉटेल तब्बल ८७ वर्षे जुने असून, ते मुंबईकरांच्या खाद्यसंस्कृतीचा एक भाग बनले आहे. सध्या विविध प्रकारच्या वडापावसाठी ग्राहकांच्या रांगा लागणारे हे कदाचित मुंबईतील एकमेव हॉटेल असेल. हे हॉटेल वडापाव, मिसळपाव, थालीपीठ, कोथिंबीरवडी आणि पियुषसाठी विशेष प्रसिद्ध आहे.




मात्र आता या हॉटेलचे या जागेतील अस्तित्व धोक्यात आले आहे. कारण रहेजा समूहाने यावर्षीच्या सुरुवातीला या १४७ वर्षे जुन्या आणि हेरिटेज ग्रेड-२ श्रेणीत असलेल्या कॅपिटल सिनेमाचा भाडेपट्टाधारक असलेल्या ‘नादीर कंपनी प्रायव्हेट लिमिटेड’चे संपादन केले आहे. पालिकेने ३० एप्रिल २०३५पर्यंत या जागेचा भाडेपट्टाही वाढवून दिला आहे. असे असले तरी या इमारतीचे ऐतिहासिक स्वरुप जपूनच तिथे काही बदल करावे लागतील. त्यामध्ये हे हॉटेल रिकामे करण्याबाबतची चर्चा सुरू झाली आहे. आराम हॉटेलचे मालक विश्वास तांबे यांनी सांगितले की, अद्याप आमच्याशी कोणीही संपर्क साधलेला नाही. आम्ही येथे अनेक दशकांपासून लाखो ग्राहकांना सेवा देत आहोत.

## मध्य रेल्वेचा दादरला नवा प्लॅटफॉर्म पश्चिम रेल्वेकडील जमीन घेणार

■ मुंबई

**दादर** रेल्वे स्थानकात मोठ्या सुधारणांची योजना आखली जात आहे. मध्य रेल्वे पाचवी-सहावी लाईन प्रकल्पांतर्गत आपल्या कॉरिडॉर आणि पश्चिम रेल्वे दरम्यान नवीन प्लॅटफॉर्म उभारण्याची योजना आखत आहे.

मुंबईतील सर्वाधिक व्यग्र स्थानकांपेकी एक असलेल्या दादर येथे गर्दी कमी करणे आणि रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. नवीन प्लॅटफॉर्मसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी पश्चिम रेल्वेकडील जमीन घेतली जात आहे. ज्याचा परिणाम दलावी नगर येथील अतिक्रमणांवर झाला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार या जागेवर ४६ अतिक्रमणे असून, त्यापैकी ४० जणांना बेदखल करण्याच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. सहा प्रकरणे अद्याप प्रक्रियेत आहेत, तर १४ प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. पुनर्वसन योजनेअंतर्गत १५ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी निवास देण्यात आला आहे. त्यापैकी १३ बांधकामे पाडण्यात आली असून, दोन अद्याप शिल्लक आहेत.

## नेस्को पार्टी प्रकरणात आणखी एकाला अटक

■ मुंबई

**गोरेगावमधील** नेस्को येथील ड्रग पार्टी प्रकरणात पोलिसांनी आणखी एका आरोपीला अटक केली आहे. बीकॉमचा विद्यार्थी असलेल्या या आरोपीला वनराई पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्यासह सहा आरोपींना १८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान ड्रगसाठी आर्थिक व्यवहार ‘स्नॅपचॅट’द्वारे होत असल्याचे उघड झाले आहे. आरोपींकडून क्यूआर कोड पाठवून पैसे स्वीकारले जात होते, तर संवादासाठी ‘व्हॉट्सॲप’चा वापर केला जात होता. या डिजिटल पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी कारवाई करत तिसऱ्या आरोपीला अटक केली.

## राजकीय विरोधानंतर नवी मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास निविदा रद्द

■ तुर्भे

**नवी** मुंबईतील तुर्भे येथील एमआयडीसीच्या जागेवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी काढण्यात आलेल्या निविदा अखेर रद्द करण्यात आल्या. या निर्णयामुळे काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना पूर्णविराम मिळाला.

एमआयडीसीकडून झोपडपट्टी भागांचा खासगी विकासकांमार्फत पुनर्विकास करण्यासाठी २७ मार्च रोजी निविदा मागवण्यात आल्या होत्या. एकूण ३ गटांमध्ये या निविदा विभागण्यात आल्या होत्या. मात्र या प्रक्रियेला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सुरुवातीपासूनच तीव्र विरोध दर्शवला होता. नवी मुंबईतील शहरी भाग, गावठाण किंवा झोपडपट्टी कोणताही विकास नवी मुंबई महापालिकेमार्फतच व्हावा, अशी भूमिका त्यांनी घेतली. एमआयडीसीच्या पुनर्विकास प्रक्रिया स्थानिक लोकांच्या हिताला बाधा आणणारी असल्याचा आरोप करत त्यांनी या निर्णयाविरोधात आंदोलनाचा इशाराही दिला होता.

## देवीच्या मिरवणुकीत तरुण क्रेनला उलटा लटकला

■ मुंबई

**मुंबईतील** मालाड परिसरात देवीच्या मिरवणुकीदरम्यान इच्छापूर्तीसाठी एक तरुण थेट हुकच्या सहाय्याने क्रेनला उलट्या अवस्थेत लटकला. मिरवणुकीत भाविकांची मोठी गर्दी असताना संबंधित तरुणाने जीव धोक्यात घालून हा प्रकार केला.

उपस्थितांनी याचा व्हिडिओ काढल्याने हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची गंभीर दखल घेत मालाड पोलीस यांनी संबंधित तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच मिरवणुकीचे आयोजक आणि क्रेन चालक यांच्यावरही निष्काळजीपणाबद्दल कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारचे धोकादायक स्टंट धार्मिक भावना आणि श्रद्धेच्या नावाखाली केले जात असले, तरी ते जीवघेणे ठरू शकतात. त्यामुळे असा प्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## विलेपार्ल्यात उड्डाणपुलाखाली शहरी शेती प्रकल्प! रविवारी उद्‌घाटन

■ मुंबई

**विलेपार्ले** विधानसभा क्षेत्राचे भाजपा आमदार पराग अळवणी यांच्या संकल्पनेतून मुंबईतील पहिल्या शहरी शेती प्रकल्पाचे उद्‌घाटन महापौर रितू तावडे यांच्या उपस्थितीत होणार असून, उपमहापौर संजय घाडी आणि महापालिका आयुक्त अश्विनी भिडे तसेच महापालिकेतील विविध समिती अध्यक्ष व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.सदर माहिती स्थानिक नगरसेवक मिलिंद शिंदे यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

एरवी उड्डाणपुलाखालील जागांवर अतिक्रमण होत असते किंवा जुन्या गाड्यांचे डम्पिंग होत असते. त्यामुळे विलेपार्ले पूर्व येथील विमानतळाच्या बाहेरील पश्चिम द्रुतगती मार्गावरील उड्डाणपुलाच्या खालील जागेचा सदुपयोग व्हावा या हेतूने विलेपार्ले कल्चरल सेंटर तर्फे शहरी शेती प्रकल्प राबवण्याचा प्रस्ताव के-दक्षिण विभागाकडून मान्य करवून घेतला, अशी माहिती पराग अळवणी यांनी दिली. या प्रकल्पात प्रत्यक्ष शास्त्रीय पद्धतीने वाफे तयार करण्यात आले असून, त्यात विविध फळ भाज्या लावण्यात येणार आहेत. मराठी विज्ञान परिषदेच्या प्रेरणेने शहरी शेती अभ्यास वर्ग चालवण्यात येणार असून, यामध्ये अनुभवी व प्रशिक्षित मान्यवर प्रत्यक्ष शेतकामाविषयी मार्गदर्शन करणार आहेत. त्याच सोबत वनस्पती वैविध्य दालन आणि वनस्पती सांभाळ केंद्र सुद्धा चालवण्यात येणार आहेत. तर फुलपाखरू उद्यान, पक्षांना आकर्षित कसे करावे, माळी काम कसे करावे इत्यादी विषयात कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पाबाबत अधिक माहिती करून घ्यायची असल्यास, मुंबई विमानतळ टी १ मेट्रो स्थानकासमोरील या प्रकल्पास रविवार १९ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता जरूर यावे, असे आवाहन आमदार पराग अळवणी व नगरसेवक मिलिंद शिंदे यांनी केले आहे.

## मुंबईत १६४ शाळा अनधिकृत! लाखो विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात

■ मुंबई

**मुंबई** शहरात तब्बल १६४ शाळा अनधिकृत असल्याची माहिती पालिकेच्या एका सर्वेक्षणातून समोर आली आहे. १६४ पैकी ४८ शाळांनी गेल्यावर्षी कागदपत्रांची

**४८ शाळांचे सरकारकडे मान्यतेसाठी प्रस्ताव**

पूर्तता करून घेण्यासाठी राज्य सरकारकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. मात्र, त्यांना राज्य सरकारची अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.

पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात पहिली ते चौथीच्या २६९ अनधिकृत शाळा असल्याचे निदर्शनास आले आहे. यापैकी ६२ शाळा बंद पडल्या आहेत. तर १३ शाळांनी राज्य सरकारकडून कागदपत्रांची पूर्तता करून मान्यता घेतली आहे.

त्यामुळे १९४ शाळांच्या व्यवस्थापनाची सुनावणी प्रक्रिया सुरू असतानाच २०२३-२४ मध्ये आणखी १६ अनधिकृत शाळा असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अनधिकृत शाळांची संख्या २१० पर्यंत पोहोचली. राज्याच्या शिक्षण विभागाने आणि शिक्षण आयुक्तालय आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयाने काढलेल्या आदेशानुसार ३० एप्रिल २०२३ पर्यंत राज्यातील अनधिकृत शाळा बंद करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेशही शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना दिले होते. मुंबईतील २१० शाळा व्यवस्थापनांना पालिकेने नोटीस बजावल्यानंतर काही शाळा बंद झाल्या. त्यामुळे १७२ अनधिकृत शाळा सुरू होत्या. परंतु त्यांच्यावर कारवाई न करण्याचे आदेश देत योग्य तो निर्णय घेतला जाईल.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

# नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# दहशतवादाचे व्हाईट कॉलर मॉड्यूल

भारतातली लोकशाही व्यवस्था ही नागरीकांना सर्वाधिक स्वातंत्र्य देणारी व्यवस्था म्हणावी लागेल. जगातील कोणत्याही लोकशाहीवादी देशात अशा प्रकारचे आचारविचार, स्वातंत्र्य दिले गेलेले नाही. भारत हा अठरापगड जातींचा देश आहे. सगळ्या प्रमुख धर्मांनी बाहेरून येऊन इथे आपले चांगले बस्तान बसवले आहे. परंपरेने असलेले पंथ, संप्रदाय या सर्वांना आपापल्या पद्धतीने धार्मिक, आचारविचार पूजापद्धती करण्याचा अधिकार आहे. लोकशाही व्यवस्थेने संसद, न्यायपालिका, कार्यपालिका यांच्याशिवाय प्रत्येक नागरीकाला किंवा वेगवेगळ्या संघटनांना आपले म्हणणे मांडण्याचा हक्क दिला आहे. आंदोलने, निदर्शने यांच्या माध्यमातून ते आपलं म्हणणं मांडू शकतात. परंतु या सगळ्या स्वातंत्र्याचा लोकशाहीच्या मजबूतकरणापेक्षा लोकशाही पोखरण्याचेच प्रकार जास्त होताना दिसतात. ज्यातून प्रामुख्याने देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला नेहमीच आव्हान मिळत गेले. गेली तीस-चाळीस वर्षे थैमान घालणारा दहशतवाद किंवा हजारो लोकांचे बळी घेणारा नक्षलवाद ही लोकशाहीने दिलेल्या अतिस्वातंत्र्याचे धोकादायक परिणाम ठरले आहेत. आता याचेच ताजे उदाहरण नाशिक इथल्या कॉर्पोरेट जिहादच्या नावाने समोर आले आहे. तपास यंत्रणांनी या प्रकरणाचे धागेदोरे जेव्हा उकलायला सुरुवात केली त्यावेळेला नाशिकचे कॉर्पोरेट जिहाद प्रकरण आणि गेल्यावर्षी दिल्लीच्या फरिदाबाद भागात झालेल्या कार बॉम्बस्फोटाशी त्याचा संबंध पोहोचत असल्याचे आढळून येते आहे. म्हणजेच संसदीय लोकशाही व्यवस्थेत मिळालेल्या सगळ्याच स्वातंत्र्याचा पूर्णपणे गैरफायदा उठवण्याचे काम देशविरोधी शक्तींनी केल्याचे यातून सिद्ध होते. इथल्याच स्वातंत्र्याचा आधार घ्यायचा आणि इथल्याच व्यवस्थेविरुद्ध दहशतवादी उपद्व्याप करीत राहायचे हा प्रकार सर्रासपणे चालू राहिला आहे. ज्याला व्हाईट कॉलर टेररिझम म्हणता येईल अशा प्रकारचा हा पांढरपेशा दहशतवाद नव्याने लोकशाहीला पोखरून काढताना दिसतो. अतिशय योजनाबद्धरीतीने नाशिकचे हे टीसीएसच्या कार्यालयात धर्मांतराचे षड्यंत्र आखले गेले. धर्मांतर हा तर एक त्यातला भाग होता. परंतु त्यातून देशविरोधी मानसिकता विकसित करण्याचाच अजेंडा राबवला जात होता.

### सुशिक्षित तरुणांचा सहभाग

दिल्लीतल्या लालकिल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाचे धागेदोरेसुद्धा जम्मू-काश्मीर आणि अहमदाबादपर्यंत जाऊन पोहोचले होते. त्यामध्ये उच्चशिक्षित अशा डॉक्टर्सचा संबंध असल्याचे स्पष्टपणे आढळून आले. म्हणजे जिहादाचे नवे मॉड्यूल अस्तित्वात येत असल्याचे त्या बॉम्बस्फोटातून लक्षात आले. दहशतवादी कारवायांमध्ये जाणीवपूर्वक उच्चशिक्षित किंवा सुशिक्षित तरुण-तरुणींना समाविष्ट करून या नेटवर्कची व्याप्ती देशभर वाढवण्याचा कट रचला गेला होता. विशेषतः उच्चशिक्षित महिलांनादेखील त्यात प्रशिक्षित केले जाते. त्यांच्याकडून प्रत्यक्ष दहशतवादी कारवायांबरोबरच धर्मांतर किंवा सरकारविरोधीचे कारस्थान घडवून आणण्याचा योजनाबद्ध प्रयत्न होतो. जम्मू-काश्मीरमध्ये तसा प्रकार आढळून आलेला आहे. दिल्लीच्या कार बॉम्बस्फोटानंतर दोन महिला डॉक्टरसह चार जणांना अटक केली गेली होती. आता तोच फॉर्म्युला वापरून टीसीएससारख्या प्रतिष्ठित कंपनीच्या छायेखाली ठराविक अशा सुशिक्षित जिहादी गटाकडून धर्मांतराचा कट केला गेला. टीसीएससारख्या कंपनीत असे काही होऊ शकेल याची कोणालाही कल्पना येऊ शकणार नाही म्हणूनच साधारणपणे गेल्या वर्षभरापासून तिथल्या काही कर्मचाऱ्यांना टॉर्चर करण्याचा प्रकार सुरू झाला होता. महिला कर्मचाऱ्यांना लग्नाचे आमिष दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडण्याचाही प्रकार केला गेला. त्याला एक महिला कर्मचारी बळी पडली. कालांतराने तिथे नमाज पढण्याची सक्ती किंवा हिंदू देवदेवतांबद्दल तिरस्कार करण्याचा प्रकारही हेतूपूर्वक केला गेला. एक मोठा गट योजनाबद्धरीतीने एवढ्या मोठ्या कंपनीमध्ये शिरकाव करतो. तिथे आपले बस्तान बसवतो आणि अन्य कर्मचाऱ्यांवर दबाव टाकण्याचाही प्रयत्न करतो. म्हणजेच सुशिक्षित तरुणांकडून हा व्हाईट कॉलर दहशतवाद निर्माण केला गेलेला आहे हे स्पष्ट होते. या प्रकरणातला जो मूळ मास्टरमाईंड आहे ती व्यक्ती अजूनही फरार आहे. मात्र ज्यांना ज्यांना अटक झाली त्यांच्या कबुलीजबाबातून विशिष्ट पद्धतीने एक मानसिक दहशत तिथे निर्माण केली गेली. नोकरी टिकवण्याच्या उद्देशाने काही काळ हा प्रकार सहन केला गेला. मात्र त्याची सक्ती जेव्हा वाढत गेली त्यावेळेला त्याला तोंड फुटले आहे.

### देशविरोधी विषवल्ली

आपल्या देशात असलेली मुक्त समाज व्यवस्था आणि त्याला मिळालेले लोकशाहीचे आचारविचार स्वातंत्र्य याचा विधायक उपयोग न करता काही गटाकडून विघातक वापर केला गेला. अगदी जम्मू-काश्मिरमध्येसुद्धा थेट पाकिस्तानातल्या फुटीरतावादी लोकांशी संधान साधले गेले होते. तिथे निदर्शने करण्यासाठी पाकिस्तानातून पैसाही पुरवला गेला होता. या सर्व गोष्टी कायद्याच्या चौकटीत बसवण्याचाही प्रयत्न झाला होता. तिथला दहशतवादाचा भस्मासूर वाढण्यामागे याच स्वातंत्र्याचा गैरवापर कारणीभूत ठरला होता. अजूनही देशाच्या अनेक भागांत छुप्या पद्धतीने दहशतवादाचे सहानुभूतीदार ठिकठिकाणी पाहायला मिळतात. पाकिस्तानात बसून इथल्या फुटीरतावादी आणि दहशतवादी मनोवृत्तींना प्रोत्साहन देण्याचे प्रयत्नही होत असतात. आतादेखील जो सुशिक्षित वर्ग दहशतवादाच्या नेटवर्कमध्ये सामील करून घेतला जातो आहे त्यातल्या अनेकांना वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक मदत केली जाते. त्यांचे ब्रेन स्टॉर्मिंग करून आपण करीत असलेले कृत्य हे कसे आपल्या धर्महिताचे आहे असे बिंबवण्याचा प्रयत्न होत असतो. प्रत्यक्ष दहशतवाद आणि त्यातून आपल्याला अनुकूल असलेल्या मानसिकतेचा विस्तार करायचा. आपल्या विचारांचा प्रभाव निर्माण करायचा. असेदेखील उद्देश ठेवले गेले. त्याचाच एक भाग म्हणजे नाशिकच्या टीसीएसमधले धर्मांतराचे प्रकरण आहे. आपला देश लोकसंख्येने इतका मोठा आहे की, तिथे कोणत्या प्रकारच्या प्रवृत्ती इथल्या व्यवस्थेचा कसा गैरफायदा घेतील याचा भरोसा नसतो. म्हणूनच टीसीएस असेल किंवा अमरावतीजवळच्या परतवाड्याचे कटकारस्थान असेल ही एकाच प्रकारची विषवल्ली ठरते.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

पंख फक्त पाखराला शोभून दिसतात.
माणसाला फुटले की त्याचा विनाश सुरू होतो.

## पंचांग

**शनिवार, १८ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* वैशाख शुक्ल प्रतिपदा
* नक्षत्र - अश्विनी
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

रवी उदय- ०६-२१
रवी अस्त- १८-५६

**वैशाख मासारंभ, नूतन चंद्र दर्शन, श्री भानुदास महाराज पुण्यतिथी, वज्रेश्वरी पालखी-वसई**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती



### कैरी आणि टोमॅटोची चटणी

★ **साहित्य :-** २ कैरी, २ टोमॅटो, ३-४ सुक्या लाल मिरच्या, एक छोटा कांदा, लसूणच्या २ पाकळ्या, मोहरीचे तेल, कढीपत्ता, मीठ, हिंग घ्या.

★ **कृती :-** सर्वात आधी एका पॅनमध्ये थोडे मोहरीचे तेल घाला. आंब्याचे दोन भाग करा, कोय काढून तेलात छान परतून घ्या. त्याचप्रमाणे टोमॅटो आणि कांद्याचे दोन भाग करा आणि तेही पॅनमध्ये घालून तेलात परतून घ्या. पॅनमध्ये लसूण पाकळ्या आणि लाल मिरच्या घाला. ८-१० कढीपत्ता घाला. आता हे मिश्रण झाकून ठेवा आणि मध्यम आचेवर ५-७ मिनिटे शिजू द्या. थोडा वेळ शिजवल्यानंतर, उलटून दुसऱ्या बाजूनेही शिजू द्या. यामध्ये थोडेसे मीठ घाला. यानंतर गॅस बंद करा आणि मिश्रण थंड होऊ द्या. आता टोमॅटोची साल काढा आणि कैरीचे बारीक तुकडे करा. आता हे सर्व पदार्थ मिक्सर जारमध्ये घ्या आणि त्यात हिंग घालून छान बारीक वाटून घ्या. चटणी मिक्सरमध्ये फिरवताना मिक्स करत राहा आणि बारीक वाटून घ्या. अशाप्रकारे कैरी, टोमॅटो आणि कांद्याची मसालेदार चटणी तयार आहे.





## क्रीडा

# कोलकाता संघाची हाराकिरी सुरूच

## शेवटच्या षटकात गुजरातचा विजय

■ अहमदाबाद

**कर्णधार शुभमन गिल याच्या अफलातून फलंदाजीच्या बळावर गुजरात टायटन्सने शेवटच्या षटकात कोलकाता नाईट रायडर्सला ५ विकेट राखून मात दिली. कोलकाताचा हा पाचवा पराभव आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये आज झालेल्या २५ व्या सामन्यात कॅमेरॉन ग्रीनच्या ७९ धावांच्या जोरावर कोलकाताने गुजरातला विजयासाठी १८० धावांचे आव्हान दिले होते. ते गुजरातने १९.४ षटकांत पार केल्यामुळे या स्पर्धेत सलग तिसरा विजय मिळवला. परिणामी गुजरातच्या संघाने आयपीएलच्या गुणतालिकेत ६ गुणांसह चौथ्या स्थानावर झेप घेतली.**



**कोलकाताने** प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र कोलकाताची सुरुवात अतिशय खराब झाली. कर्णधार अजिंक्य रहाणेला खाते उघडण्यापूर्वीच गोलंदाज मोहम्मद सिराजने तंबूत धाडले. कागिसो रबाडाने अंगकृश रघुवंशी (८) आणि टिम सेफर्ट (१९) या दोन्ही फलंदाजांना बाद केले. त्यामुळे कोलकाताची अवस्था ४ षटकांत ३ बाद ३२ धावा अशी झाली.

कॅमेरॉन ग्रीन आणि रोव्हमन पॉवेल यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र कॅमेरॉन ग्रीन जोरदार फटकेबाजी करत असताना अशोक शर्माने पॉवेलला झेलबाद केले. त्याने २० चेंडूंत २७ धावा केल्या. अनुकूल रॉय आणि रिंकू सिंग एकामागून एक झटपट बाद झाले. रमणदीप सिंगनेही ८ चेंडूंत १७ धावा करून कॅमेरॉन ग्रीनची साथ सोडून गेला. सुनील नरेन (०) आणि कार्तिक त्यागी (६) हे ग्रीनला चांगली साथ देऊ शकले नाही. शेवटच्या पाच षटकांत विकेट पडल्यामुळे दबावात असलेल्या कॅमेरॉन ग्रीनचे फटके हुकत होते. त्यामुळे संघाची धावगती मंदावली. शेवटी कॅमेरॉन ग्रीन ५५ चेंडूंत ७९ धावा आणि वैभव अरोरा ० धावा करून नाबाद राहिला. परिणामी निर्धारित षटकांत कोलकाताला ९ बाद १८० धावाच करता आल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरातचे सलामीवीर साई सुदर्शन आणि कर्णधार शुभमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी ५ षटकांत ५७ धावांची भागिदारी केली. मग सुनील नरेनने साई सुदर्शनला २२ धावांवर बाद केले. त्यानंतर जोस बटलर शुभमन गिलच्या साथीत १५ चेंडूंत २५ धावा करून माघारी परतला.

मात्र शुभमन गिलची धडाकेबाज खेळी सुरूच ठेवली. त्याला वॉशिंग्टन सुंदरने चांगली साथ देईल, असे वाटत असताना सुंदर १३ धावा करून तंबूत परतला. ग्लेन फिलिप्स आणि गिल यांच्यासमोर विजयासाठी शेवटच्या २४ चेंडूंत ३२ धावांची गरज होती. त्यानंतर १ चौकार ठोकून गिल ५० चेंडूंत ८० धावा करून बाद झाला. फिलिप्स १६ चेंडूंत १९ धावा करून बाद झाला तर राहुल तेवतिया ७ धावा आणि शाहरूख खान ३ धावा करून नाबाद परतले. त्यामुळे गुजरातने १९.४ षटकांत विजयी लक्ष्य गाठले.

# विक्रोळी पूर्वेमध्ये आजपासून आमदार चषक कबड्डी स्पर्धा

■ मुंबई

**क्रीडाप्रेमी** आमदार सुनील राऊत यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित आमदार चषक कबड्डी स्पर्धेवर छप्पर फाडके पुरस्कारांचा वर्षाव केला. ही स्पर्धा १८ ते २१ एप्रिलदरम्यान विक्रोळी पूर्वेला टागोर नगरातील डॉ.बाबासाहेब आंबडेकर उद्यानात होणार आहे. सुनील राऊत यांनी श्रीमान योगी प्रतिष्ठानाच्या संयोजनाखाली राज्यातील व्यावसायिक कबड्डी संघांची ताकद दाखवण्याचे आव्हान स्वीकारले. महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना आणि मुंबई उपनगर कबड्डी संघटनेच्या मान्यतेने होणार्या कबड्डीच्या पकडापकडींच्या संघर्षासाठी आंबडेकर उद्यानातील क्रीडानगरीला 'कबड्डी पंढरी'चे रुप दिले आहे. राज्यातील पुरुष आणि महिलांचे अव्वल आणि बलवान संघ स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे कबड्डीप्रेमींना प्रो कबड्डीला साजेशी चढाओढ पाहायला मिळणार आहे.

# एमसीएचा मुंबईच्या खेळाडूंसाठी ऐतिहासिक वार्षिक मानधन करार

■ मुंबई

## २० लाखांपर्यंत मानधन

**मुंबई** क्रिकेट असोसिएशन (एमसीए)ने एक ऐतिहासिक निर्णय घेत क्रिकेटपटूंसाठी वार्षिक मानधन करार प्रणाली सुरू केली आहे. असा करार करणारी ही भारतातील पहिलीच राज्य क्रिकेट संघटना ठरली आहे. असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी खेळाडूंसाठी या ऐतिहासिक कराराची घोषणा केली. एमसीएच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. या वार्षिक मानधन करारासाठी खेळाडूंची 'अ', 'ब' आणि 'क' अशा गटांत विभागणी करण्यात येणार आहे. 'अ' गटातील खेळाडूंना प्रत्येक वर्षी १२ लाख ते २० लाख रुपये, 'ब' गटातील खेळाडूंना ८ लाख ते १२ लाख रूपये देण्यात येतील. 'क' गटातील खेळाडूंना ८ लाख रुपये मिळतील.खेळाडूंना त्यांची कामगिरी, तंदुरुस्ती आणि निवड समितीच्या शिफारसीनुसार करार देण्यात येईल. करारांतर्गत येणाऱ्या खेळाडूंना मंडळाच्या नियमानुसार सामन्याचे मानधन, दैनिक भत्ते आणि कामगिरीच्या आधारे प्रोत्साहन रक्कमही मिळेल.


### फॉर्म ए - जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**ओडिसीया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | ओडिसीया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १४ डिसेंबर, २०१८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - दिल्ली |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक | U52599DL2018PTC343068 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ४५-ए, पहिला मजला, सदनिका बी-२, बेगमपूर, मालविय नगर, नवी दिल्ली, दिल्ली, भारत - ११००१७. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | ८ एप्रिल, २०२६ आदेश दि. ८ एप्रिल, २०२५ रोजी वितरित झाला. तथापि तो एनसीएलटी पोर्टलवर १६ एप्रिल, २०२६ रोजी अपलोड झाला होता. त्यानुसार, दावा सादरीकरणाचे वेळापत्रक आयआरपीद्वारे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून विचारात घेण्यात येईल. |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ५ ऑक्टोबर, २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPE-0059/IPA-1/2022-23/50037 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड १६०१, चांडक युनिकॉर्न, दत्ताजी साळवे मार्ग, ऑफ वीरा देसाई मार्ग, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. नोंदणीकृत ईमेलः irp@kdraip.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड १६०१, चांडक युनिकॉर्न, दत्ताजी साळवे मार्ग, ऑफ वीरा देसाई मार्ग, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. नोंदणीकृत ईमेलः irp@kdraip.com प्रक्रिया विशिष्ट ईमेल आयडीः cirp.odicea@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३० एप्रिल, २०२६ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः | (अ) वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, दिल्ली खंडपीठ यांनी **दि. ८ एप्रिल, २०२६** रोजी ओडिसीया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
ओडिसीया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. ३० एप्रिल, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे. **कृपया नोंद घ्यावी की,** आदेश दि. ८ एप्रिल, २०२५ रोजी वितरित झाला. तथापि तो एनसीएलटी पोर्टलवर १६ एप्रिल, २०२६ रोजी अपलोड झाला होता. त्यानुसार, दावा सादरीकरणाचे वेळापत्रक आयआरपीद्वारे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून विचारात घेण्यात येईल.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
**केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
अंतरिम ठराव व्यावसायिक
ओडिसीया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड
**दिनांकः** १८ एप्रिल, २०२६
**ठिकाणः** मुंबई
**आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPE-0059/IPA-1/2022-23/50037**
**एएफए वैधता दिनांक - ३१ डिसेंबर, २०२६**

### जाहीर उद्घोषणा

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)

**श्री. दीपक नागजीभाई पटेल (स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्री. दीपक नागजीभाई पटेल |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | सदनिका क्र. ९००, ९वा मजला, शानुदीप बिल्डींग, मफतलाल हाऊस, अल्टामाऊंट रोड, कंबाला हिल, केम्प्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६. |
| ३ | वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | ०६.०४.२०२६, १०.०४.२०२६ रोजी कळविण्यात आले. |
| ४ | अर्ज स्वीकारल्याच्या आदेशाचे तपशील | सी.पी.(आयबी) क्र. ३७६/एनसीएलटी/(एमबी)/२०२५ एनसीएलटी मुंबई खंडपीठ-VI आदेश दिनांक ०६.०४.२०२६ द्वारे आयबीसी, २०१६ च्या कलम १०० अन्वये स्वीकारण्यात आली. |
| ५ | ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | आयपी मेघा अग्रवाल नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P01456/2018-2019/12272 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ताः** ००१ शिवरंजिनी अपार्टमेन्ट्स, कॉंग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये, कॉंग्रेस नगर, नागपूर ४४००१२. **ईमेलः** ip.meghaagrawal@gmail.com |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | प्लॉट क्र. ७२, अंजनेय निवास, न्यू ट्रिनिटी हॉस्पिटल समोर, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिरजवळ, वर्धा रोड, नागपूर ४४००१५. **ईमेलः** ibcpg.irp@gmail.com |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०८.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | वेबलिंकः https://www.ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-VI यांनी दि. ०६.०४.२०२६ रोजी श्री. दीपक नागजीभाई पटेल (स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. दीपक नागजीभाई पटेल यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०८.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ७ मध्ये उल्लेखिलेल्या पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे.
धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे आणि टपालाने सादर करावे.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

दिनांकः १८.०४.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/-
**आयपी मेघा अग्रवाल**
**श्री. दीपक नागजीभाई पटेल**
(स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) करिता
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-001/IP-P01456/2018-19/12272
**एएफए वैधता** दि. ३०.०६.२०२७ पर्यंत
**ईमेलः** ibcpg.irp@gmail.com
**नोंदणीकृत कार्यालयः** ००१, शिवरंजिनी अपार्टमेन्ट्स, कॉंग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये, कॉंग्रेस नगर, नागपूर ४४००१२.
**पत्रव्यवहाराचा पत्ताः** प्लॉट क्र. ७२, अंजनेय निवास, न्यू ट्रिनिटी हॉस्पिटल समोर, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिरजवळ, वर्धा रोड, नागपूर ४४००१५.
**ईमेलः** ip.meghaagrawal@gmail.com

### जाहीर उद्घोषणा

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)

**सौ. श्वेता दीपक पटेल (स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | सौ. श्वेता दीपक पटेल |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | सदनिका क्र. ९००, ९वा मजला, शानुदीप बिल्डींग, मफतलाल हाऊस, अल्टामाऊंट रोड, कंबाला हिल, केम्प्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६. |
| ३ | वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | ०६.०४.२०२६, १०.०४.२०२६ रोजी कळविण्यात आले. |
| ४ | अर्ज स्वीकारल्याच्या आदेशाचे तपशील | सी.पी.(आयबी) क्र. ३७७/एनसीएलटी/(एमबी)/२०२५ एनसीएलटी मुंबई खंडपीठ-VI आदेश दिनांक ०६.०४.२०२६ द्वारे आयबीसी, २०१६ च्या कलम १०० अन्वये स्वीकारण्यात आली. |
| ५ | ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | आयपी मेघा अग्रवाल नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P01456/2018-2019/12272 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ताः** ००१ शिवरंजिनी अपार्टमेन्ट्स, कॉंग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये, कॉंग्रेस नगर, नागपूर ४४००१२. **ईमेलः** ip.meghaagrawal@gmail.com |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | प्लॉट क्र. ७२, अंजनेय निवास, न्यू ट्रिनिटी हॉस्पिटल समोर, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिरजवळ, वर्धा रोड, नागपूर ४४००१५. **ईमेलः** ibcpg.irp@gmail.com |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०८.०५.२०२६ |
| ९ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | वेबलिंकः https://www.ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-VI यांनी दि. ०६.०४.२०२६ रोजी सौ. श्वेता दीपक पटेल (स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
सौ. श्वेता दीपक पटेल यांच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०८.०५.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ७ मध्ये उल्लेखिलेल्या पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे.
धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे आणि टपालाने सादर करावे.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

दिनांकः १८.०४.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/-
**आयपी मेघा अग्रवाल**
**सौ. श्वेता दीपक पटेल**
(स्वामी नारायण डायमण्ड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) करिता
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-001/IP-P01456/2018-19/12272
**एएफए वैधता** दि. ३०.०६.२०२७ पर्यंत
**ईमेलः** ibcpg.irp@gmail.com
**नोंदणीकृत कार्यालयः** ००१, शिवरंजिनी अपार्टमेन्ट्स, कॉंग्रेस नगर गार्डनच्या सर्कलमध्ये, कॉंग्रेस नगर, नागपूर ४४००१२.
**पत्रव्यवहाराचा पत्ताः** प्लॉट क्र. ७२, अंजनेय निवास, न्यू ट्रिनिटी हॉस्पिटल समोर, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिरजवळ, वर्धा रोड, नागपूर ४४००१५.
**ईमेलः** ip.meghaagrawal@gmail.com

# महिलांना ८ ग्रॅम सोने! दरमहा २.५०० विजय यांचे जाहीरनाम्यात आश्वासन

■ चेन्नई

**तामिळनाडूतील** २३एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी टीव्हीकेचे प्रमुख विजय यांनी काल पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात ६० वर्षांखालील महिलांना दरमहा १,५०० रुपये आर्थिक मदत, विवाहासाठी ८ ग्रॅम सोने आणि प्रत्येक कुटुंबाला वर्षाला सहा मोफत गॅस सिलिंडर देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

अभिनेता ते राजकारणी बनलेल्या विजय यांनी गरजू वधूंना सोन्यासोबत दर्जेदार रेशीम साडी देण्याचे तसेच महिलांच्या स्वयं-साहाय्य गटांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज देण्याचेही आश्वासन दिले. सत्तेत आल्यास भ्रष्टाचारमुक्त आणि चांगले प्रशासन



देण्याचेही त्यांनी आश्वासन दिले. विजय यांची ही त्यांची पहिली निवडणूक आहे.

जाहीरनाम्यात शिक्षणालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शाळा सोडणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी सरकारी आणि अनुदानित शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आई किंवा पालकांना दरवर्षी १५,००० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. विजय यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडवून आणणारे नेते के. कामराज यांच्या नावाने १०० विशेष निवासी शाळा सुरू करण्याचे आणि उच्च शिक्षणासाठी २० लाख रुपयापर्यंत कर्ज देण्याचेही जाहीर केले. तसेच एआय मंत्रालय, एआय विद्यापीठ आणि एआय सिटी स्थापन करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे.

देश विदेश

# राष्ट्राध्यक्ष पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येणार

■ मॉस्को

**रशियाचे** राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर येणार आहेत. यावर्षी ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी भारताला भेट देणार आहेत. ब्रिक्स शिखर परिषद ही एक वार्षिक बैठक आहे, ज्यात ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यासारख्या देशांचे प्रमुख नेते आणि नवीन सदस्य देशांचे नेते सहभागी होतात. बिक्स शिखर बैठकीत आर्थिक सहकार्य, व्यापार, जागतिक प्रशासन आणि भू-राजकीय मुद्द्यांवर चर्चा होते.

शिखर परिषदेच्या अधिकृत तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. पहिली शिखर परिषद २००९ मध्ये रशियात झाली. दक्षिण आफ्रिका २०१० मध्ये सामील झाला. व्यापार, गुंतवणूक, विकास बँक, दहशतवाद विरोध, हवामान बदल, जागतिक शासनात सुधारणा या गोष्टींवर चर्चा केली जाते. मात्र, २०२४ पासून इजिप्त, इथिओपिया, इराण, यूएई आणि सौदी अरेबिया हे देशही ब्रिक्स पल्स म्हणून सामील झाले.

# इराणची नाकेबंदी करणारे अमेरिकेचे नौसैनिक अर्धपोटी

■ वॉशिंग्टन

**मध्य** पूर्वेत इराणची नाकेबंदी करत असलेल्या अमेरिकेच्या नौदलाच्या सैनिकांना दोन वेळचे जेवण मिळणे कठीण झाले आहे, असा आरोप सैनिकांच्या कुटुंबियांनी केला आहे. येथील एका वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार सैनिकांना पोटभर अन्न दिले जात नाही. हे सैनिक अर्धपोटी इराणची नाकेबंदी करत आहेत.

सोशल मीडियावर अमेरिकेच्या नौसैनिकांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या थाळीचे दोन फोटो व्हायरल झाले आहेत. त्यातील एका फोटोतील थाळीमध्ये एक छोटासा मांसाचा तुकडा, एक टॅर्टिला एवढेच पदार्थ दिसत आहेत. तर दुसऱ्या फोटोतील थाळीमध्ये उकडलेल्या गाजराचे तुकडे आणि प्रक्रिया केलेले मांसाचे तुकडे दिसत आहेत.

यूएसएस त्रिपोली या युध्दनौकेवर तैनात एका महिला नौसैनिकाच्या पित्याने सांगितले की, जहाजावरील ताज्या भाज्या आणि फळांचा साठा संपला आहे. परिस्थिती एवढी वाईट आहे की सैनिकांच्या जेवणाच्या कोट्यात कपात केली जात आहे.

# मराठवाड्यात विक्रमी तापमानाचा बळी...

**जगातील पहिल्या १० उष्ण शहरात विदर्भातील तीन जिल्ह्यांचा समावेश झालेला आहे. तर देशातील पहिल्या दहा उष्ण शहरात मराठवाड्यातील बीडचा समावेश झाला आहे. वाढलेल्या उष्णतेचा फटका सगळ्यांनाच बसत आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यातील हिंगोली येथे एका तीस वर्षीय इसमाचा उष्माघाताने मृत्यू झाला. एप्रिल महिन्यातच मराठवाड्यात उष्णतेचा तडाखा बसल्याने एकाचा बळी गेल्याने आणखी पुढील दीड ते दोन महिने कसे जातील, या विचारात अनेकजण आहेत. मराठवाड्यात उष्णतेची लाट दिवसेंदिवस वाढतच आहे. येत्या चार दिवसांत आणखी उष्णता वाढणार असल्याचे राज्य शासनाच्या हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

डॉ. अभयकुमार दांडगे

**मराठवाड्यातील** आठ जिल्ह्यांपैकी सर्वाधिक तापमान परभणी जिल्ह्यात राहत असे. परंतु आता बीड व नांदेड जिल्ह्याने यामध्ये सर्वाधिक तापमानाची नोंद असलेला जिल्हा म्हणून एक वेगळी ओळख करून दिली आहे. देशातील पहिल्या १० उष्ण शहरांपैकी मराठवाड्यातील बीडच्या ४३.१ अंश तापमानाची नोंद झाली आहे. मराठवाड्यात सर्वत्रच चाळीसी पार अशी तापमानाची नोंद सध्या आहे. बीडमध्ये ४३ तर नांदेड जिल्ह्यात तापमानाने ४२ डिग्री एवढी नोंद घेतली आहे. वाढत्या तापमानामुळे मराठवाड्यातील नागरिक हैराण आहेत. दरम्यान वाढत्या उष्णतेमुळे हिंगोलीत उष्माघाताचा एक बळी गेल्याची नोंद आहे.

हिंगोली बस स्थानक परिसरात एकाचा मृतदेह आढळला होता हिंगोली शहर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविला रफिक शेख उस्मान असे त्या मयत इसमाचे नाव असून तो ३० वर्षांचा होता. उत्तरीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्या इसमाचा मृत्यू उष्माघातामुळे झाला, असे स्पष्ट केले . सदरील इसम दोन दिवसांपूर्वी मुलाला सोडण्यासाठी हिंगोली येथे आला होता परंतु तो इसम घरी न परतल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला. परंतु तो उष्माघातामुळे मरण पावल्याचे कळताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. मराठवाड्यात वाढती उष्णता जीवघेणी ठरत असून उष्माघाताचा बचाव करण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेत यंदा उन्हाळा अधिक कडक असल्याचे जाणवत आहे. सकाळी दहा ते अकरा वाजण्याच्या सुमारासच उन्हाचे कडक चटके जाणवत आहेत. एकीकडे उन्हाची तीव्रता , चटके व दुसरीकडे वेळी अवेळी महावितरणची वीज गुल होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. दिवसा व रात्री कधीही अनेक तास भारनियमन केले जात आहे. यामुळे नागरिकांचा त्रास अधिक वाढला आहे. सदरील भारनियमन अघोषित असून त्याचाच सर्वाधिक फटका नागरिकांना बसत आहे.

मराठवाड्याचा पारा ४० अंशाच्या पुढे सरकल्याने त्याच्या झळा बाजारपेठेतही दिसून येत आहेत. पालेभाज्यांनाही उन्हाचा तडाखा बसला असून आवक रोडावल्याने भाज्यांचे



भाव वाढले आहेत. बाजारात पालक, मेथी, कोथिंबीरचे दर वाढले आहेत. तर मोजक्या प्रमाणात करडी व चुका येत आहे. एका जुडीमागे वीस रुपये आकारले जात आहेत. बाजारात पत्ताकोबी ,फुलकोबी ,भेंडी, गवार, शेवगा, दिलपसंद दुधी भोपळा, लाल भोपळा, दोडके ,वांगी आदींचा भाव हा शंभर रुपये किलोपर्यंत स्थिरावला आहे. केवळ मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात पुढील चार दिवस अत्यंत धोक्याचे असणार आहेत. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर उष्ण आणि दमट वातावरण कायम राहणार आहे. त्याच्या झळा मराठवाड्यालाही पोहोचणार आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील तापमान ४३ अंशाच्या पुढे देखील जाणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे . भरपूर पाणी पिणे, हलके कपडे घालणे आणि थेट उन्हात जास्त वेळ न थांबणे या गोष्टीचे पालन करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात सर्वत्रच दुपारच्या वेळी संचारबंदीसारखा शुकशुकाट दिसून येत आहे. रात्री उशिरापर्यंत उष्णता जाणवत आहे.

उन्हाच्या प्रखर लाटेने मराठवाडा अक्षरशः भाजून निघत आहे. आठही जिल्ह्यात एप्रिल महिन्यातच अशी परिस्थिती असल्याने आणखी मे व जून महिना उष्णतेच्या बाबतीत कसा असेल यावर चर्चा व भीती व्यक्त केली जात आहे. शेतकरी वर्ग शेतातील कामे सकाळीच उरकून घेत आहेत. सकाळी दहाच्या नंतर शेतात थांबणे शक्य होत नसल्याने पहाटे पाच वाजताच शेतकरी वर्ग कामाला लागत आहे.

स्वतःची शेती असणारा शेतकरी भल्या पहाटे उठून शेतात कामाला लागत आहे. परंतु तेवढ्या सकाळी शेतात कामावर येण्यासाठी मजूर भेटत नसल्याने अनेकांची गैरसोय होत आहे. या वाढत्या उष्णतेबरोबरच १९ एप्रिलनंतर राज्यातील काही जिल्ह्यात अवकाळी पाऊस पडणार असल्याचे संकेत दिले जात आहेत. कडक उन्हाळा व अधून मधून पडणारा अवकाळी पाऊस यामुळे लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य मात्र बिघडत आहे.

# शालार्थ आयडी घोटाळ्यात २५० शिक्षकांची चौकशी

■ नाशिक

**नाशिक** शालार्थ आयडी घोटाळ्याची विभागीय समितीकडून नाशिक एसएससी बोर्ड कार्यालय येथे तपासाला सुरुवात झाली आहे. समितीने दोन दिवसांत तब्बल २५० शिक्षकांची चौकशी केली आहे. या चौकशीदरम्यान संबंधित शिक्षकांना सेवा सुरू करण्याची तारीख, नोंदणी प्रक्रिया आणि शालार्थ आयडी काढण्याबाबत सविस्तर प्रश्न विचारण्यात येत आहेत. बोगस कागदपत्रांच्या आधारे आयडी तयार करून शासनाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचा संशय आहे.

मार्च २०१९ ते जून २०२५ या कालावधीत नाशिक विभागात सुमारे १५० ते २०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड झाले होते. बनावट कागदपत्रांच्या आधारे ८०० हून अधिक अपात्र शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे बोगस शालार्थ आयडी तयार करून सरकारी तिजोरीतून पगार घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी एसआयटी मार्फत सखोल चौकशी सुरू असून, अनेक अधिकारी आणि संस्थाचालक तपासाच्या रडारवर आले आहेत.

**मशीन विकणे आहे**

**'लिज्जत' संस्थेची रॅप पॅकिंग मशीन चांगल्या व व्यवस्थित स्थितीमध्ये त्वरित विकायची आहे.**

Excel Packs Make Servo PLC Model
Horizontal Flow Wrap Packing Machine
alongwith
Domino Make TTO Model Printer

पत्ता : ४१३, मिलन इंडस्ट्रियल इस्टेट, टी. जे. रोड, कॉटनग्रीन, मुंबई - ४०००३३

इच्छुक पार्टीने स्वत:च्या ऑफर बंद पाकिटासह प्रत्यक्ष भेटावे.

संपर्क : ९८९२३१३५६८ विनायक हरयान

SYMBOL OF WOMAN'S STRENGTH

**श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड**

(खादी आणि ग्रामोद्योग आयोग द्वारा मान्य)

Website : www.lijjat.com Email : enquiry@lijjat.com

# गिरगावात पाईपलाईन फुटली हजारो लीटर पाणी वाया

■ मुंबई

**गिरगावमधील** क्रांतिनगर गेटसमोर आज पहाटे पाणीपुरवठ्याची पाईपलाईन फुटल्याने हजारो लीटर पाणी वाया गेले. या घटनेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला.

रस्त्याच्या कामादरम्यान संबंधित ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे ही पाईपलाईन फुटल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. घटनेनंतर बराच वेळ पाणी वाया जात राहिल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. आधीच मुंबईत पाणीकपातीची शक्यता वर्तवली जात असताना, अशा प्रकारे पाण्याची नासाडी होणे ही गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

**WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED**

(formerly Unimoni Financial Services Limited)
RO: N.G. 12 & 13 Ground Floor, North Block, Manipal Centre, Dickenson Road, Bangalore - 560 042. CIN No. U85110KA1995PLC018175

**PUBLIC NOTICE**

याद्वारे जनतेला कळविण्यात येते की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या लिलाव WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED (formerly Unimoni Financial Services Limited) द्वारे 25-04-2026 रोजी सकाळी 10.00 वाजता खाली दिलेल्या संबंधित केंद्रावर केला जाईल. लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने आमच्या विविध ग्राहकांच्या कर्ज खात्यातील आहेत ज्यांनी त्यांची थकबाकी भरली नाही. या कर्जदारांना आमच्या लिलावाच्या नोटिसा रीतसर बजावण्यात आल्या आहेत, लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने शाखेच्या नावासह खाली नमूद केलेल्या आमच्या विविध ग्राहकांच्या थकीत कर्ज खात्यांचे आहेत.

Auction Centre Address & Loan Nos: MUMBAI - MIRA ROAD (MUI - OFFICE NO 1,2,3, FIRST FLOOR,S2 - SHOPPING CENTRE,BUILDING NO A, 63/64, SHANTHI,Contact : 9819142430) 2160618. MUMBAI - THANE (MUT -NO.8, ABHIMAN - II,OPP. FOREST OFFICE, L.B.S ROADNEAR TEENHATH NAKA, THANE WEST,Contact : 9833417655) 2257757

(Reserves the right to alter the number of accounts to be auctioned &/ postpone / cancel the auction without any prior notice)

**बँक ऑफ महाराष्ट्र**
**Bank of Maharashtra**
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

अंचल कार्यालय: मुंबई उत्तर
कॉर्पोरेट फायनान्स शाखा
युनिट क्र. ७०८, ७ वा मजला, आयएनएस टॉवर, प्लॉट क्र.६३, 'जी' ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१
ई-मेल आयडी: bom2083@bankofmaharashtra.bank.in

**खातेधारकांना आणि सर्वसामान्यांना सूचना.**

सर्व खातेदार आणि सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आणून देण्यात येत आहे की बँक ऑफ महाराष्ट्र, कॉर्पोरेट फायनान्स शाखा (२०८३), जी यापूर्वी यशोमंगल, ६३२, गांधी नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ येथे स्थित होती, ती आता नवीन पत्त्यावर युनिट क्र.७०८, ७वा मजला, आयएनएस टॉवर, प्लॉट क्र. ६३, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ येथे स्थलांतरित केली जात आहे. बँकेच्या ग्राहकांना स्थलांतर प्रक्रियेदरम्यान कोणतीही गैरसोय होणार नाही याची खात्री करण्यासाठी बँकेकडून योग्य ती काळजी घेतली जात आहे हे स्पष्ट करण्यात येते. ग्राहकांना विनंती आहे की त्यांनी वरील बदलाची कृपया नोंद घ्यावी. त्यांनी आपली खाती नवीन शाखेतून, सदर नवीन ठिकाणाहूनच चालवावीत, याची खात्री करावी, अशीही त्यांना विनंती करण्यात येत आहे. जर आणखी काही स्पष्टीकरण आवश्यक असेल आणि/किंवा कोणतीही अडचण आल्यास ग्राहक संबंधित शाखेच्या शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधू शकतात.

**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**मध्यवर्ती ई-निविदा कक्ष विभाग**
**जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०६ (सन २०२६-२७)**

नाशिक महानगरपालिका, नाशिक **आग्निशामन व आपत्तकालीन विभागाकडील – ०४ या** कामाची जाहिर ई-निविदा सुचना क्रमांक ०६ (सन २०२६-२७) दिनांक १७/०४/२०२६ पासुन दिनांक ११/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो मा.शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक ११/०५/२०२६ राहील.

**टीप** – यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.

स्वाक्षरीत/ –
कार्यकारी अभियंता
मध्यवर्ती ई– निविदा कक्ष प्रमुख
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जनसंपर्क/जा.क्र/१७/२०२६
दि.१७/४/२०२६

गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

महावितरण

**ई-निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सांगली मंडल कार्यालयांतर्गत महावितरण सूचीबध्द ठेकेदारांकडून खालील प्रमाणे ई-निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | SE/SC/T/PTF Minor Repair/T-01/2026-27 | सन २०२६-२७ करिता पावर ट्रान्सफार्मर चे वार्षिक किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु. ५० लाख | रु. ५०,०००/- |
| २. | SE/SC/T/T-02/ 2026-27 | ३३/११ के व्ही उपकेंद्रासाठी (पावर ट्रान्सफार्मर वगळुन)प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्तीची (preventive maintenance) कामे करणे | रु. ५० लाख | रु. ५०,०००/- |

सदर ई-निविदा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संकेत स्थळावर https://etender.mahadiscom.in/eatApp/ दि. १७.०४.२०२६ पासुन उपलब्ध आहे. निविदा सादर करणेची अंतीम तारिख २४.०४.२०२६, दुपारी ३.०० वाजे पर्यंत आहे.

संपर्क - कार्यकारी अभियंता (प्रशासन), महावितरण मंडल कार्यालय, सांगली
दुरध्वनी व मोबाईल क्र. ७८७५७६९०१२

PRO NO:- PRO/KOPZ/20/2026-27

अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, सांगली

# राहुल गांधींविरोधात एफआयआर दाखल करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

■ लखनौ

**अलाहाबाद** उच्च न्यायालय लखनौ खंडपीठाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचे



आदेश दिले आहेत. न्यायालयाने हे प्रकरण पुढील चौकशीसाठी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) कडे हस्तांतरित करण्याचे निर्देशही दिले.

भाजपा कार्यकर्ते एस. विग्नेश शिशिर यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली होती. याचिकेत त्यांनी राहुल गांधींवर ब्रिटिश नागरिकत्व घेतल्याचा आरोप केला. न्यायालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सीबीआयला पुढाकार घेण्यास सांगितले. यापूर्वी, २८ जानेवारी २०२६ रोजी खासदार-आमदार न्यायालयाने विग्नेश शिशिर यांची याचिका फेटाळून लावली होती. त्या वेळी नागरिकत्वासंदर्भात कोणतेही ठोस किंवा नवीन पुरावे सादर झाले नसल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. सुनावणीदरम्यान न्यायाधीश सुभाष विद्यार्थी यांनी गृह मंत्रालयाच्या परदेश विभागाला प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मंत्रालयाने आवश्यक फाइल न्यायालयात सादर केल्या. याचिकाकर्त्याच्या दाव्यानुसार, सादर केलेल्या दस्तऐवजांमधून राहुल गांधी हे युनायटेड किंगडमचे मतदार होते, असे संकेत मिळतात.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सुचना क्र./१७/२०२६

खालील कामांसाठी म.औ.वि.महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | कोरी ई-निविदा उपलब्ध कालावधी |
|---|---|---|---|
| अ) | का.अ., मऔविम, विवयां.विभागांतर्गत अहिल्यानगर उपविभाग, अहिल्यानगर. | | |
| १ | शिर्डी औद्योगिक क्षेत्रात अशुद्ध व शुद्ध जलउदंचन केंद्र येथे पंपींग मशिनरी पुरविणे, उभारणे, चाचणी व कार्यान्वित करणे, तसेच इतर आनुषंगीक कामे करणे. | २,१५,८४,३९३/- | दि.२३/०४/२०२६ ते दि. ०८/०५/२०२६ |

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**निविदा सुचना क्र. MT-०१ (२०२६-२७)**

कार्यकारी अभियंता ग (द) विभाग, मुं.इ.दु.व पु.मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत इमारतींच्या दुरूस्तीच्या ०५ कामाकरीता म्हाडा/मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ के. सा.बां. विभाग/ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे सुशिक्षित बेरोजगार अभियंता या वर्गाच्या मुंबईतील नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांकडुन खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

सविस्तर माहिती म्हाडाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरु | २०.०४.२०२६ सकाळी ११.०० वाजता |
| २ | निविदा विक्री बंद | २७.०४.२०२६ दुपारी ०१.०० वाजता |
| ३ | निविदा स्विकृती | २८.०४.२०२६ सकाळी ११.०० वाजता ते दुपारी २.३० पर्यंत |
| ४ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | दिनांक २८.०४.२०२६, सायं ५.३० नंतर शक्य झाल्यास. |

सक्षम प्राधिकारी यांना १ किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग (दक्षिण विभाग)
मुं.इ.दु.व पु. मंडळ, मुंबई - १३

CPRO/A/312
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

# धारावी मलजल प्रकल्प जुलैपर्यंत सुरू करण्याचे आयुक्ताचे आदेश

■ मुंबई

**मुंबईतील** पर्यावरणाच्या दृष्टीने मलजल प्रक्रिया केंद्र महत्त्वपूर्ण असून धारावीतील मलजल प्रक्रिया केंद्र येत्या जुलै २०२७ पर्यंत पूर्ण करा, असे निर्देश मुंबई महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले. काल भिडे यांनी शहरातील विविध विकासकामांची पाहणी केली.

धारवीतील ४१८ दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र आणि चुनाभट्टी रेल्वे स्थानक परिसरात पावसाचे पाणी साचू नये, म्हणून पर्जन्य जलवाहिन्या विभागाने केलेल्या उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला. मुंबईत सध्या वरळी,वांद्रे, मालाड, घाटकोपर, धारावी, भांडुप आणि वर्सोवा अशा सात ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्रे उभारण्याचे काम सुरू आहे.

**फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**
(महाराष्ट्र शासकीय उपक्रम.)
CIN -U45200MH1974 SGC17206
पंजीकृत कार्यालय - एफडीसीएम भवन, ३५९ / बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपुर -४०० ०३६
विभागीय कार्यालय - विभागीय व्यवस्थापक, वनप्रकल्प विभाग, ठाणे यांचे कार्यालय, बंगला नं.९ अ, बारा बंगला, कोपरी ठाणे पुर्व - ४००६०३ दुरध्वनी - ०२२-२५३२९६८६

**जाहीर निविदा सुचना**

टर्न- की कार्यकेंद्रामार्फत प्रस्तावित जी. एम. एल. आर. प्रकल्पा अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष रोपवनाभोवती चैनलिंग फेन्सिंग करणे करीता इच्छुक ठेकेदार, यांचेकडुन ई- निविदा www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. निविदांचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | कामाचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६/FDCM/ २०२६-२७ | Providing Chainlink fencing to the area for GMLR Plantation Revati Sr. No. 38, Tal. Kalyan under the Range of turnkey project | २२,४४२ | ९० दिवस | मजुर सहकारी संस्था |
| २ | ७/FDCM/ २०२६-२७ | Providing Chainlink fencing to the area for GMLR Plantation Vadghar Sr. 126 Tal. Panvel under the Range of turnkey project | ३०,३२९ | ९० दिवस | खुला |

१. ई- निविदेचा दिनांक १७.०४.२०२६ ते २४.०४. २०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत भरता येईल
२. सदर ई - निविदा संकेतस्थळावर मागविण्यात येत असुन अधिक माहीती करीता विभागीय व्यवस्थापक, ठाणे कार्यालयाशी व fdcm.co.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.
३. ई-निविदा दिनांक २५.०४.२०२६ दुपारी २.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.


सही/-
विभागीय व्यवस्थापक,
वन प्रकल्प विभाग, ठाणे

जा. क्र. विव्य/ प्रविठा/कक्ष-६/टर्न-की/६८/सन २०२६-२७, ठाणे-३
दिनांक - १७/०४/२०२६




# 'बुलेटप्रूफ' माझ्यासाठी 'माईलस्टोन' : किंग

प्राईम व्हिडिओ इंडियाने वॉर्नर म्युझिक इंडियाच्या सहकार्याने 'लुख्खे' या आगामी मूळ मालिकेतील बुलेटप्रूफ हे अतिशय ऊर्जावान हिप-हॉप गाणे प्रदर्शित केले आहे. किंग, अमिरा गिल आणि करण कांचन यांनी संगीतबद्ध केलेले हे गाणे आता सर्व संगीत स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले आहे. किंग आणि अमिरा गिल यांनी गायलेल्या या गाण्याचे शब्द किंग आणि मनरीत खारा यांनी लिहिले आहेत. या गाण्याबद्दल बोलताना किंग म्हणाला की, बुलेटप्रूफ हे माझ्यासाठी वैयक्तिक स्तरावर अत्यंत महत्त्वाचे गाणे आहे. माझा आतापर्यंतचा प्रवास, संघर्ष, विजय आणि सतत पुढे जाण्याची जिद्द यातून हे गाणे साकारले गेले आहे. 'लुख्खे' या मालिकेच्या निमित्ताने मला केवळ संगीत निर्मितीचीच संधी मिळाली नाही, तर प्रथमच अभिनयाच्या क्षेत्रात पाऊल ठेवता आले. अमिरा, करण आणि संपूर्ण टीमने हे गाणे जिवंत करण्यासाठी घेतलेल्या मेहनतीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हिमांक गौर दिग्दर्शित आणि विपुल डी. शाह व राजेश बहल निर्मित लुख्खे या मालिकेतून किंग अभिनयात पदार्पण करत आहे. या मालिकेत राशी खन्ना, पलक तिवारी आणि लक्ष्यवीर सिंग सरन यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.




# 'कुछ कुछ होता है' जावेद अख्तर यांनी का नाकारला ?

करण जोहरचा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट असलेला 'कुछ कुछ होता है आज एका 'कल्ट चित्रपटाच्या श्रेणीत गणला जातो. या चित्रपटासाठी सुरुवातीला ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांची निवड करण्यात आली होती. परंतु त्यांनी हा चित्रपट नाकारला आणि नंतर समीर अनजान यांनी यातील अजरामर गाणी लिहिली. यामागे मुख्य कारण होते चित्रपटाचे शीर्षक. एका मुलाखतीत त्यांनी स्वत: कबूल केले की, त्यांना 'कुछ कुछ होता है' हे शीर्षक अश्लील वाटले होते. त्याकाळात सिनेसृष्टीत दुहेरी अर्थाची गाणी लिहिली जात होती. करणच्या चित्रपटाचे शीर्षकही त्याच धाटणीतील असल्याचा समज जावेद यांचा झाला. पण आज मला या निर्णयाचा पश्चाताप होतो, अशी प्रांजळ कबुली ते देतात. गीतकार समीर अनजान यांनी अलीकडेच एका मुलाखतीत सांगितले की, त्यांनी हा प्रकल्प स्वीकारण्यापूर्वी आदरापोटी जावेद अख्तर यांना फोन केला होता. त्यावेळी ते म्हणाले, मी हा चित्रपट करत नाहीये आणि माझा तुलाही सल्ला आहे की, तूही करू नकोस. कारण हा दिग्दर्शक थोडा अतरंगी आहे आणि तो कोणाचेही ऐकून घेत नाही. पण जावेद साहेबांचा सल्ला असूनही, समीर यांनी जेव्हा चित्रपटाची कथा ऐकली, तेव्हा ते प्रभावित झाले. त्यांना शीर्षकात काहीही वावगे वाटले नाही. विशेष म्हणजे, समीर यांना हा चित्रपट करण जोहरमुळे नाही, तर यश चोप्रा यांच्यामुळे मिळाला होता.



प्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाह आणि निर्माती एकता आर कपूर एका नवीन मालिकेसाठी एकत्र आल्या आहेत. बालाजी टेलिफिल्म्सच्या वतीने तयार करण्यात येणारी 'कोके' ही मालिका नेटफ्लिक्स इंडियावर प्रसारित होणार आहे. ही एक पीरियड ड्रामा शैलीची मालिका असून, यामध्ये शेफाली शाह मुख्य भूमिकेत दिसणार आहे. मालिकेच्या कथानकाचे तपशील अद्याप उघड करण्यात आले नसले तरी, तिची

# शेफाली आणि एकताची 'कोके'



भूमिका अत्यंत प्रभावी आणि महत्त्वपूर्ण असणार असल्याचे समजते. या मालिकेचे दिग्दर्शन नूपुर अस्थाना करणार आहेत, ज्यांनी यापूर्वी 'फोर मोर शॉट्स प्लीज' आणि 'द रॉयल्स' सारख्या मालिकांचे दिग्दर्शन केले आहे. या मालिकेचे चित्रीकरण येत्या २० एप्रिलपासून सुरू होणार आहे. अनेक वर्षांपासून दूरदर्शन आणि डिजिटल माध्यमांवर सक्रिय असलेल्या एकता कपूर आणि कसदार अभिनयासाठी ओळखल्या जाणाऱ्या शेफाली शाह यांचे हे एकत्र येणे प्रेक्षकांसाठी विशेष ठरणार आहे. बालाजी टेलिफिल्म्सच्या वतीने स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मसाठी तयार करण्यात येत असलेल्या विविध विषयांच्या मालिकेचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

# अहसासच्या शिरपेचात मानाचा तुरा




अभिनेत्री अहसास चन्नाची मुख्य भूमिका असलेला 'गुदगुदी' हा चित्रपट ७९ व्या कान चित्रपट महोत्सवात प्रदर्शनासाठी निवडला गेला असल्याची अधिकृत घोषणा निर्मात्यांनी केली आहे. १२ ते २३ मे २०२६ दरम्यान आयोजित होणाऱ्या या जागतिक कीर्तीच्या महोत्सवातील मार्शे डू फिल्म या महत्त्वाच्या विभागात या चित्रपटाचे स्क्रीनिंग होणार आहे. सोशल मीडियावर या निवडीची घोषणा करताना निर्मात्यांनी चित्रपटाचे पोस्टर्स शेअर केले असून, या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. आमचा आणखी एक विशेष चित्रपट कानपर्यंत पोहोचला आहे... हा क्षण तुमच्यासोबत शेअर करताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. मनिषा मकवाना आणि अहसास चन्ना यांच्यासारख्या ड्रीम टीमसोबतचे हे स्वप्न सत्यात उतरले आहे, अशा शब्दांत निर्मात्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मनिषा के. मकवाना दिग्दर्शित गुदगुदी या चित्रपटाच्या निमित्ताने अहसास चन्नाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक असलेल्या कानमध्ये या चित्रपटाचे स्क्रीनिंग होणे, हा केवळ अहसासच्या कारकिर्दीतीलच नव्हे, तर भारतीय चित्रपटसृष्टीसाठीही अभिमानाचा क्षण आहे. जागतिक स्तरावर भारतीय चित्रपटांची दखल घेतली जात असल्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

# आयुष्मान-साराच्या 'उडता तीर'ची घोषणा



धर्मा प्रोडक्शन्स आणि सिख्या एंटरटेनमेंट यांनी त्यांच्या चौथ्या सहयोगाची घोषणा केली असून, 'उडता तीर' हा स्पाय-कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात आयुष्मान खुराणा आणि सारा अली खान यांची जोडी पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र दिसणार आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून, गेल्या काही काळापासून याच्या निर्मितीची चर्चा सुरू होती.

यापूर्वी 'किल', 'ग्यारह ग्यारह' आणि 'द लंचबॉक्स' यांसारख्या चित्रपटांसाठी एकत्र आलेल्या या दोन मोठ्या निर्मिती संस्थांनी आता स्पाय-कॉमेडी या वेगळ्या विषयाला हात घातला आहे. यामध्ये ॲक्शन, विनोद आणि निखळ मनोरंजनाची मेजवानी प्रेक्षकांना मिळणार आहे. आकाश ए. कौशिक या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात पदार्पण करत आहेत. 'उडता तीर' या चित्रपटाची निर्मिती करण जोहर, आदर पूनावाला, अपूर्वा मेहता, गुनीत मोंगा कपूर आणि अचिन जैन यांच्यासारख्या दिग्गज निर्मात्यांनी केली आहे. लोकप्रिय कलाकार आणि अनुभवी निर्मिती संघ यामुळे या चित्रपटाबद्दल आतापासूनच मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटाचे कथानक आणि इतर कलाकारांबद्दलची माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. आयुष्मान आणि सारा अली खान हे 'पती पत्नी और वोह २' या आगामी विनोदी चित्रपटातही एकत्र काम करत आहेत.

# कार्तिक आणि रीमाची हातमिळवणी ?

अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याच्या कारकिर्दीतील एका अत्यंत रंजक वळणावर असून, तो दिग्दर्शिका रीमा कागती यांच्या आगामी चित्रपटात झळकण्याची शक्यता आहे. नाम: पिक्चर्स या निर्मिती संस्थेच्या बॅनरखाली तयार होणाऱ्या या प्रकल्पासाठी कार्तिकसोबत प्राथमिक चर्चा सुरू असल्याचे समजते. हा प्रकल्प सध्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर असून, चित्रपटाबद्दलचे इतर तपशील अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहेत. कार्तिकने अद्याप या चित्रपटासाठी अधिकृत स्वाक्षरी केलेली नसली तरी, या भूमिकेसाठी तो सध्या मुख्य शर्यतीत आहे.



रीमा कागती आणि कार्तिक आर्यन या दोघांचीही काम करण्याची शैली पूर्णपणे भिन्न आहे. रीमा कागती यांनी यापूर्वी 'तलाश', 'गोल्ड', 'दहाड' आणि 'सुपरबॉईज ऑफ मालेगाव' यांसारख्या वैविध्यपूर्ण विषयांवरील चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. दुसरीकडे, कार्तिक आर्यन आता आपल्या चॉकलेट बॉय प्रतिमेच्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिकांकडे वळताना दिसत आहे. अशा परिस्थितीत रीमा कागती यांच्यासोबतचा हा चित्रपट त्याच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा आणि वेगळा चित्रपट ठरू शकतो.

# भ्रष्ट सरकारमुळे बंगालची दुरवस्था
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका

■ कोलकाता

**महाराष्ट्राचे** मुख्यमंत्री भाजपाच्या निवडणूक प्रचारासाठी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. कोलकाता येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी बंगालमधील सत्तारुढ तृणमूल काँग्रेसवर सडकून टीका केली. ममता दिदींच्या भ्रष्ट सरकारमुळे एकेकाळी पहिल्या पाच राज्यांमध्ये असलेल्या बंगालची आज दुरवस्था झाली आहे, असे फडणवीस म्हणाले.

एकेकाळी कोलकाता ही उद्योगाची राजधानी होती. देशातील अनेक बड्या उद्योगांची सुरुवात प.बंगालमधून झाली. हे राज्य देशाचे ग्रोथ इंजिन मानले जात होते.आधी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे सरकार आणि ममता दिदींच्या सरकारमध्ये बंगालची बिकट अवस्था झाली आहे. असेच जर सुरू राहिले तर बंगालच्या भावी पिढ्यांचे भवितव्य अंधःकारमय असेल, असे फडणवीस म्हणाले.

राज्यातून उद्योग बाहेर जात असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. याप्रसंगी त्यांनी मागील वर्षाची आकडेवारी सांगितली. २०२५ मध्ये राज्यातून ६ हजार ८९५ बडे उद्योग बाहेर गेले. त्यांपैकी बहुतांश उद्योग महाराष्ट्रात आले आहेत. काही दिवसांपूर्वी आम्ही महाराष्ट्रात दोन मोठ्या उद्योगांसोबत सामंजस्य करार केले.

# रिसॉर्टमध्ये खेळताना पडून मुलाचा मृत्यू

■ विरार

**विरारच्या** अर्नाळा येथील ड्रीम वर्ल्ड या रिसॉर्टमध्ये खेळताना पडून जखमी झालेल्या १५ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. आर्यन कानोकिया असे या मुलाचे नाव आहे. मार्च महिन्यात ही दुर्घटना घडली होती. मुलावर मुंबईच्या केईएम रुग्णालयात उपचार सुरू होते. आर्यन कानोकिया हा गोरेगावच्या आरे कॉलनीमध्ये राहत होता. २० मार्च रोजी तो आपल्या कुटुंबासह अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर असलेल्या ड्रीम वर्ल्ड या रिसॉर्टमध्ये सहलीसाठी आला होता. दुपारी तो खेळत असताना घसरगुंडीवरून खाली पडला. त्याच्या मणक्याला दुखापत झाली. त्याला उपचारासाठी मुंबईच्या केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# पिल्लईला हाँगकाँगला जाण्याची परवानगी द्यावी! कोर्टाने स्पष्ट केले

**ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे निर्देश**

■ मुंबई

**विशेष** न्यायालयाने गँगस्टर कुमार पिल्लई याच्या पुनर्वसन संदर्भातील संभ्रम दूर केला. पिल्लई याला सिंगापूरमधून प्रत्यार्पित करण्यात आले असले तरी तो हाँगकाँगचा नागरिक आहे. न्यायालयासमोरचा कायदेशीर प्रश्न असा होता की, त्याला ज्या देशातून प्रत्यार्पित केले गेले त्या देशात परत पाठवावे की, त्याच्या मूळ देशात पाठवावे? यावर निर्णय देताना विशेष न्यायालयाने पिल्लईला हाँगकाँगला जाण्याची परवानगी द्यावी, असे स्पष्ट केले. न्यायालयाने पुढे राज्य सरकारला त्यांच्या प्रवासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.

विशेष मकोका न्यायाधीश सत्यनारायण आर. नवंदर यांनी फेब्रुवारीमध्ये पिल्लई याची याचिका मंजूर केली होती. त्यात त्याने आपल्या मूळ देश हाँगकाँगला परत जाण्याची परवानगी मागितली होती. कारण ज्या सर्व प्रकरणांमध्ये त्याचे प्रत्यार्पण झाले होते त्यातून त्याची निर्दोष मुक्तता झाली होती. मुंबई गुन्हे शाखेने स्पष्टता मागितली होती की त्याने सिंगापूरला परत जाणे आवश्यक आहे की, हाँगकाँगला याचा निर्णय द्यावा. न्यायालयाने नमूद केले की, प्रत्यार्पण आदेशात खटला पूर्ण झाल्यानंतर अर्जदाराला अनिवार्यपणे सिंगापूरला परत पाठवण्याची कोणतीही अट नाही. तसेच या संदर्भात सिंगापूरला कोणतेही आश्वासन सरकारी यंत्रणा किंवा भारत सरकारने दिलेले नाही, आणि सिंगापूरकडूनही त्यांना पुन्हा ताब्यात घेण्याची कोणतीही मागणी आलेली नाही.

# शरद पवार गटाचे नेते
## प्राजक्त तनपुरे भाजपात जाणार?

■ अहिल्यानगर

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस आणि इतर भाजपा नेत्यांच्या विनंतीवरून राहुरी पोटनिवडणुकीपासून दूर राहिलेले शरद पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री प्राजक्त तनपुरे २० एप्रिल रोजी भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभेतील जागा भाजपा आमदार शिवाजीराव कार्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झाली आहे. या निवडणुकीसाठी भाजपाने त्यांचे सुपुत्र अक्षय कार्डिले यांना उमेदवारी दिली आहे. शरद पवार गटाकडून प्राजक्त तनपुरे हे उमेदवार म्हणून चर्चेत होते. मात्र, ऐनवेळी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल न करता माघार घेतली. त्यामुळे शरद पवार यांनी गोविंद मोकाटे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली. आता प्राजक्त तनपुरे २० एप्रिल रोजी आपली भूमिका जाहीर करणार आहेत. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन ते पुढील राजकीय दिशा स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# लहान प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी मुंबईत दोन नवीन स्मशानभूमी



■ मुंबई

**मुंबईत** लहान पाळीव आणि भटक्या लहान प्राण्यांसह पक्ष्यांवर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करता यावेत यासाठी मुंबई महापालिकेने दोन ठिकाणी नवीन आधुनिक स्मशानभूमी सुविधा सुरू केली आहे. देवनार आणि महालक्ष्मी येथे १ एप्रिलपासून ही नवीन मृतदेह दहन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

पालिकेच्या पशुवैद्यकीय आरोग्य विभागाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी या दोन दहनभूमी कार्यान्वित केल्या आहेत. अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले की, महालक्ष्मी येथे टाटा ट्रस्ट प्राणी रुग्णालयात लहान प्राणी व पक्ष्यांसाठी ५० किलो क्षमतेची अत्याधुनिक विद्युत दहन यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. देवनार कत्तलखान्यात ५०० किलो क्षमतेची पाईप लाईनच्या गॅसवर चालणारी आधुनिक दाहिनी सुरू करण्यात आली आहे. तर मालाडमधील एव्हरशाईन नगर (कोंडवाडा) येथे याआधीच म्हणजे २०२३ पासून अशाप्रकारची सुविधा उपलब्ध आहे. त्यासाठी नागरिकांना पालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन बुकिंग करता येईल. नागरिकांना त्यावर नोंदणी करून आपल्या पसंतीच्या केंद्रावर वेळ निश्चित करता येईल किंवा ७५६४९७६६४९ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# यादगीरमध्ये बस-कारची धडक

■ बंगळूरू

**कर्नाटकातील** यादगीर जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यात खासगी ट्रॅव्हल्स बस आणि कार यांच्यात जोरदार धडक होऊन त्यानंतर भीषण आग लागली. या आगीत सहा प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. दरम्यान, मृत्यूमुखी पडलेले सहा जण एकाच कुटुंबातील असून ते देवदर्शनावरून परत येत होते

खासगी आरामदायी बस बंगळुरूहून कलबुर्गीकडे जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारने बसला धडक दिल्यानंतर बसने तत्काळ पेट घेतला. आग लागल्याने बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. जीव वाचवण्यासाठी प्रवासी घाईघाईने बाहेर पडू लागले. मात्र, या दुर्घटनेत सहा प्रवाशांना बाहेर पडता न आल्याने ते आगीत होरपळून मृत्यूमुखी पडले. इतर काही प्रवाशांनी कसाबसा जीव

**सहा जणांचा मृत्यू**

वाचवला असून, जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी आग विझवण्याचे काम सुरू केले.

# अखेर बेस्ट कर्मचाऱ्यांना मिळाला प्रलंबित कोविड भत्ता

**२९ कोटींचा निधी उपलब्ध**

■ मुंबई

**कोविड** महामारी काळात स्वतःच्या जिवाची पर्वा न करता मुंबईकरांच्या सेवेत तत्पर राहिलेल्या बेस्टच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना अखेर ६ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर कोविड भत्ता मिळण्यास सुरुवात झाली आहे. कोविड काळात प्रत्यक्ष सेवा बजावलेल्या ९ हजार ७७ कर्मचाऱ्यांना हा कोविड भत्ता मिळणार आहे. यासाठी २९ कोटी २२ लाख ३८ हजार ७१७ रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

बेस्ट उपक्रम आधीच आर्थिक अडचणीत असल्याने



निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देणे. तसेच निवृत्त कर्मचारी व कोविडदरम्यान काम केलेले कर्मचारी यांना कोविड भत्ता देणे बेस्ट उपक्रमाला शक्य झाले नव्हते.


कोविड काळातील भत्ता मिळण्यासाठी गेली ६ वर्षे बेस्ट कर्मचारी बेस्ट उपक्रमाकडे आस लावून होता.कोविड भत्ता देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने पालिकेकडे वारंवार मागणी केली होती. अखेर मुंबई महापालिकेने बेस्ट उपक्रमाला कोविड भत्त्यापोटी अनुदान उपलब्ध केले आहे. आता टप्प्याटप्प्याने हे कोविड भत्ता वाटप सुरू केले आहे.

# मस्साजोग सरपंच निवडणूक बिनविरोध होणार नाही

■ बीड

**मस्साजोगचे** दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या जागेवर होत असलेली सरपंचपदाची पोटनिवडणूक बिनविरोध होणार, हे आता स्पष्ट झाले आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच पैकी केवळ तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. तर स्वरूपानंद देशमुख यांनी अर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे आता अश्विनी देशमुख - स्वरूपानंद देशमुख अशी लढत होणार आहे. मस्साजोगच्या सरपंच पदाची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी अशी दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची अपेक्षा होती. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच उमेदवारांपैकी संजीवनी देशमुख, पंजाब देशमुख आणि करुणा देशमुख या तीन उमेदवारांनीच आपला उमेदवारी अर्ज मागे घेतले. मागील सरपंचपदाच्या निवडणुकीत ९ मतांनी पराभूत होणारे स्वरूपानंद देशमुख यांनी आपला अर्ज कायम ठेवला आहे.

# मुठा कालव्याच्या दरवाजाचे कुलूप तोडून पाण्याची चोरी




■ पुणे

**जिल्ह्यातील** हवेली तालुक्यातील उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील खेडेकर मळा परिसरात मुठा कालव्याच्या दरवाजाचे कुलूप तोडून बेकायदेशीरपणे पाणी सोडल्याची घटना उघडकीस आली. यामुळे सिंचन विभागाच्या पाणी वितरण व्यवस्थेत मोठी अनियमितता निर्माण झाली असून, शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील तीन दिवसांत अजिंठा लाँड्री शेजारी असलेल्या जुना मुठा कालवा वितरिका क्र. ५० (किमी ६०/२००) येथे हा प्रकार घडला आहे. कोणा अज्ञात इसमाने कालव्याच्या दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर दरवाजा वर उचलून बेकायदेशीरपणे पाणी सोडल्याने पाणी वितरण व्यवस्थेचा बोजवारा उडाला. याप्रकरणी पाटबंधारे विभागाचे अधिकारी गिरीषकुमार जाधव यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास उरुळी कांचन पोलीस करीत आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे- १५७९



**आडवे शब्द –**

१. मनात हेतू धरून केलेले व्रत ४. हाताचा तडाखा ७. दुसऱ्याला दुःखी बघून आनंदित होणारा ११. बासरी वाजवणारा श्रीकृष्ण १३. स्त्री १५. शेवट १६. बिन तेलाची लहान पोळी १७. खाल्ल्या मिठाला न जागणारा, कृतघ्न २०. शंका, अनिश्चितता, चणचण २२. ग्रामस्थ २५. अंकुर २७. प्रथा २८. केसाची बट ३०. एखादी गोष्ट हातची निसटणे ३१. संकटातून तारणारा ३२. जल ३३. आयुष्याची गेलेली वर्षे ३४. छपरावर घातला जाणारा खापराचा तुकडा ३५. रक्तवाहिनी ३६. कोवळी फांदी ३७. धावन ३९. कबूतर ४०. टिकाव ४१. सकाळचे तरतरी आणणारे पेय ४२. व्रत ४४. समुद्रातील अग्नी ४६. पाडा ४७. गवाक्षातून किंवा फटीतून आलेले किरण ४९. नाचगाण्यांचा कार्यक्रम ५०. बस्तान ५१. सखोल ज्ञान असलेला, जाणता ५४. मुलाची बायको ५६. लाडके मूल ५८. जड ६१. परिमार्जन ६३. शिष्य ६४. वचक ६६. कारभारी, कुटुंबप्रमुख ६८. उंची ७०. सळईवर भाजून बनवलेला पदार्थ ७१. कांद्याचे रूंद पान ७२. तुरीच्या डाळीचे कालवण ७३. नर्तकीच्या पायातील अलंकार ७४. अंगठ्याशेजारचे बोट ७६. कौशल्य ७७. सुईचे छिद्र ७९. फेब्रुवारीत एकोणतीस दिवस असलेले वर्ष ८०. संताप ८१. नियमित वावर असणे ८३. मुलींचे नाक टोचल्यावर त्यात अडकवलेली बारीक तार ८५. पाषाण ८६. लाल रंग ८७. पिता ८९. ढोंग ९०. घोड्याला केलेले मालीश ९२. नमते घेणे ९४. विनय, संकोच ९५. शरीर ९६. वीज तयार करणारे यंत्र ९७. पायऱ्या असलेली विहीर ९८. शेजारी, लागून असलेले १००. आकाशातील तारकासमूह १०४. सुगरण नावाचा पक्षी १०५. दूध वाहतुकीचे मोठे भांडे १०६. राजाप्रमाणे थाटात १०७. भारताच्या पूर्व सीमेवरील समुद्र

**उभे शब्द –**

१. सागर २. मोटार ३. मळलेले, अस्वच्छ ४. भेद, अंतर ५. कंप पावणारा आवाज ६. ब्रेड ७. छत, चांदवा ८. सत्पुरुष ९. उपाय १०. मांडवाला लावलेली चुणीदार पट्टी (अ.व.) १२. दमदाटी १४. आश्रय १६. मोफत १८. अधिकार १९. गोड २१. मदिरा २३. आभा, तेज २४. संगोपन २६. पाठीचे खालचे हाड २९. चलनवलन ३१. साठ मिनिटे ३२. पाळलेला प्राणी ३३. खेकसून बोलणे ३५. वस्तू, जिन्नस ३८. नामांकित ४०. रीत ४१. रास, चळत ४३. कोल्हापुरी दागिना ४५. मीठ ४६. सायंकालीन मुहूर्त ४८. पतीची/पत्नीची आई ४९अ. शेतसारा (हिं.), आमीर खानचा गाजलेला सिनेमा ५१. गणपतीचे प्रिय फूल, जपाकुसुम ५२. भांबावलेला, अस्वस्थ झालेला ५३. कंदर्प ५५. दिमाख ५७. सौंदर्य ५९. अभिनेता ५९अ. प्रजा ६०. झुंड ६२. शेवट ६३. लाल रंगाचे लहान विदेशी फळ ६५. कणखर, मजबूत ६७. मऊ ६८. कपाळ ६९. विनंतीचे पत्र ७१. परवचा ७३. धनुष्य ७४. मजबूत, पुष्ट ७५. बेचव ७६. समर्थन ७७. पुढारी ७८. दह्याचे पाचक पेय ७९. चमत्कार ८०. उसाचा आटवलेला रस ८२. अनुनभवी, लहान ८३. दोरखंड ८४. कारकून ८५. रव्याचा गोड पदार्थ ८६. थयथयाट ८८. वार्ताहर ८९. तल्लीन ९१. निशा ९२. उजळणी ९३. धांदल ९४अ. पशूप्रमाणे ९५. उदी, विभूती ९९. सज्ज १००. उष्णता १०१. धुंदी, कैफ १०२. पायजमा १०३. लोणी कढवून तयार होणारे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७८ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. उकड ४. ऋतू ६. आरसा ९. विशेष ११. ठेचा १२. कलंकित १३. लाव्हारस १५. रेडा १६. पचका १९. ताडोबा २०. वन २२. नक्र २३. उर्वरित २५. दगड २६. वमन २८. वाखाणणी ३०. विप्र ३२. क्षर ३३. वसा ३५. कौपीन ३७. मातबरी ३९. विषाद ४१. कमाल ४३. खजूर ४४. गाऱ्हाणे ४५. सुरसुरी ४७. गब्बर ४८. रास ४९. गजरा ५०. वार ५१. दाब ५२. झोप ५४. अजब ५५. समर ५७. गडप ५९. खळखळाट ६१. रीघ ६३. चपला ६४. दास ६५. कवी ६६. पुनीत ६८. आमटी ६९. खडा ७०. बळ ७१. आस्था ७२. सेनापती ७५. आस ७६. कळप ७७. गाव ७९. जलतरण ८१. घूमजाव ८३. मीलन ८५. खीर ८७. वहिवाट ८९. धरण ९०. अंध ९२. वाहक ९४. रफू ९६. चकित ९८. महान ९९. बस १००. सफल १०१. जाणीवपूर्वक १०२. गीजर १०३. बदल

**उभे शब्द** : १. ताशेरे ३. कटाप ४. ऋचा ५. सालंकृत ६. आततायी ७. सालाबादप्रमाणे ८. परवड १०. षडानन ११. ठेका १४. सन १७. चरखा १८. सर्व २१. कव २३. उणीव २४. रिक्षा २७. महिषासूरमर्दिनी २८. वारकरी २९. कपी ३१. दोरी ३४. साखरझोप ३५. कौरव ३६. नगारा ३८. बळजबरी ४०. दर ४२. लगबग ४४अ. ऱ्हास ४६. सुधा ४९. गज ५०. वास ५३. नळ ५४. अटकळ ५६. गुपचूप ५८. डळमळीत ५९. खसखस ६०. खड्डू ६२. घटस्थापना ६६. पुरोगामी ६७. तसे ७०. बडेजाव ७१. आळ ७३. नाक ७४. तीज ७५. आणखी ७८. वलयांकित ८०. लग्न ८२. वहिनी ८४. पुरवणी ८६. रवानगी ८८. टरफल ९१. धमक ९३. कबर ९५. फूल ९७. टापू १००. सद

# महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर

पान १ वरून -

आणि पंतप्रधान मोदींची तुलना करत म्हटले की, जादूगाराची एक जादू अपयशी झाल्यावर त्याच्या सर्वच जादूंवर लोक हसू लागले.

राहुल गांधी यांच्या या वक्तव्यामुळे सत्ताधारी भाजपा खासदार भयंकर चिडले. पंतप्रधानांना जादूगार म्हणणे हे योग्य नाही असे म्हणत त्यांनी गदारोळ केला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही राहुल गांधी यांना या वक्तव्यावर खडसावण्याचा प्रयत्न केला. पण या सर्वांत राहुल गांधी यांना जो संदेश पोहोचवायचा होता तो पोहोचला. या कारणाने विरोधक खूश झाले होते. आपल्या संदेशाच्या अखेरीस राहुल गांधी म्हणाले की, मतदारसंघाची फेरफार करून हे अन्याय करीत आहेत. महिलांना आरक्षण द्यायचे तर ते आताही देता येईल, पण त्यांचा मूळ उद्देश हा मतदारसंघ फेरफार विधेयक मंजूर करणे हाच आहे आणि त्यात आम्ही त्यांना यश मिळून देणार नाही. या विधेयकात ओबीसी, अल्पसंख्याक यांना प्रतिनिधीत्व देण्याचा भाजपाचा कोणताही विचार नाही. हा अन्याय आम्ही होऊ देणार नाही. राहुल गांधी यांनी पंतप्रधानांवर टीका करताना बालाकोटचा जादूगार, सिंदूरचा जादूगार, नोटबंदीचा जादूगार असे शब्द वापरले. यावर आक्षेप घेताना राजनाथ सिंह आणि किरेन रिजिजू म्हणाले की, राहुल गांधी हे सैनिकांचा अपमान करीत आहेत. शूर जवानांच्या लढ्याला ते जादूगार म्हणत आहेत. त्या टिकेला उत्तर देताना राहुल गांधी म्हणाले की, भाजपा आणि त्यांच्या नेतृत्वाला वाटते की, ते म्हणजेच भारताची जनता आहे. त्यांना असेही वाटते की, ते म्हणजेच लष्कर आहे. पण ते भारताची जनताही नाहीत आणि सशस्त्र सेनाही नाहीत.

## प्रियंका गांधी यांनी हसत टोले लगावले



काँग्रेसच्या प्रियंका गांधी यांनी आज संसदेत बोलताना कडवटपणा किंवा नावे ठेवणे टाळत सत्ताधाऱ्यांना हसत-हसत टोले लगावले..प्रियंका गांधी म्हणाल्या की, तुम्ही सगळे पूर्ण तयारीनिशी आला आहात. आज जर चाणक्य जिवंत असते, तर तेही तुमच्या चलाखीने चकित झाले असते. पंतप्रधान म्हणत आहेत की, त्यांना याचे श्रेय नको आहे. मी म्हणते की, वारंवार फसवणूक करणाऱ्या पुरुषांना महिला ओळखतात. सावध राहा, नाहीतर एकदिवस पकडले जाल. ३० वर्षे हा निर्णय कसा रखडला. सत्ताधारी पक्षातील माझ्या सहकाऱ्यांना हे कदाचित आवडणार नाही, पण याची सुरुवातही नेहरू नावाच्या व्यक्तीनेच केली होती. पण काळजी करू नका, हा तो नेहरू नाही ज्यांना तुम्ही टाळता. मोतीलाल नेहरू यांनी १९२८ मध्ये १९ मूलभूत अधिकारांचा अहवाल तयार करून काँग्रेस कार्यकारिणीकडे सादर केला होता. १९३१ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली कराची अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात ठराव मंजूर झाला आणि भारतीय राजकारणात महिलांच्या समान हक्कांची सुरुवात झाली. त्याच वेळी एक मत, एक नागरिक, एक मूल्य ही संकल्पना रुजली. अमेरिकेसारख्या देशांना हे हक्क मिळवण्यासाठी अधिक वेळ लागला. हे संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर झाले तर भारतातील लोकशाही संपेल.

# राज्यातील १७ लाख कर्मचारी २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर

पान १ वरून

शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करा, प्रलंबित मागण्यांचा चर्चेच्या माध्यमातून विचार करण्यास्तव मुख्यमंत्री स्तरावर नियतकालीन चर्चासत्राचे व्यासपीठ निर्माण करा, चतुर्थश्रेणी व वाहनचालक कर्मचाऱ्यांचे भरतीविषयक प्रश्न सोडवा या मागण्यांचा समावेश आहे.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कारकिर्दीत सरकारी कर्मचारी-शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत वेळोवेळी चर्चा करून दिलासा दिला गेला होता. परंतु नव्या शासनाला वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटला तरी पूर्वी दिलेल्या आश्वासनांचा त्यांनह विसर पडला आहे. सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना १ मार्च २०२४ पासून लागू करण्यात आली आहे. परंतु गेली दोन वर्षे या शासनाला या योजनेची कार्यपध्दती, नियम, अटी व शर्ती याबाबतची अधिसूचना प्रसृत करण्यास, अद्याप वेळ मिळालेला नाही. यामुळे १ मार्च २०२४ पासून आजपर्यंतच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या हजारो कर्मचाऱ्यांचे भवितव्य हकनाक टांगणीला लागले आहे. संबंधितांना जगण्यासाठी तात्पुरते निवृत्ती वेतन न मिळाल्यामुळे संबंधितांची मोठी आर्थिक कुचंबणा सुरू आहे, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

# अनिल अंबानी समूहातील अमिताभ झुनझुनवाला, अमित बापना यांना ५ दिवसांची ईडी कोठडी

पान १ वरून

आहे. निर्णय प्रक्रियेची साखळी आणि अंतिम लाभार्थी शोधण्यासाठी ई-मेलसारख्या डिजिटल पुराव्यांचाही अभ्यास केला जात आहे. झुनझुनवाला हे २००७ ते २०१९ दरम्यान रिलायन्स कॅपिटल लिमिटेडचे मुख्य वित्त अधिकारी होते आणि रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडमध्ये संचालकही होते. संशयाखाली असलेल्या कंपन्यांना कर्ज मंजूर आणि वितरित करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्या पदामुळे समूहातील आर्थिक व्यवहारांवर त्यांचे नियंत्रण होते. त्यामुळे निधीची रचना व हालचाल याबाबत त्यांना माहिती होती किंवा त्यासाठी ते जबाबदार होते, असे ईडीचे म्हणणे आहे. बापना यांनी समूहात वरिष्ठ वित्तीय पदांवर काम केले आहे. त्यांची भूमिका कर्ज प्रस्ताव प्रक्रिया करणे, वितरण समन्वय करणे आणि कर्ज घेणाऱ्या कंपन्यांमधील निधीच्या वापरावर लक्ष ठेवणे यामध्ये होती, अशी चौकशी सुरू आहे.


**जाहीर सूचना**

येथे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल खाली अनुसूचीत वर्णन केलेल्या मालमत्तेचा विकास करण्याचा मानस बाळगून आहेत, जी मालमत्ता श्री. भरत माधव पेंडसे यांच्या मालकीची आहे.

सदर मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणत्याही व्यक्तीस विक्री, अदलाबदल, वारसा, गहाण, भेट, भाडेपट्टा, धारणाधिकार, प्रभार, ट्रस्ट, देखभाल, सुखसोयी, ताबा, वहिवाट, जप्ती, प्रलंबित खटले किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास, त्यांनी त्यासंबंधीचा दावा व त्यास समर्थन करणारी कागदपत्रे या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरूपात कळवावीत, अन्यथा, असा कोणताही दावा असल्यास तो त्याग केलेला मानण्यात येईल.

**वर संदर्भित अनुसूची:**

जमीन असलेल्या सर्व्हे क्र.९६, प्लॉट क्र.१ आणि २, सर्व्हे क्र.९७, प्लॉट क्र. २, सर्व्हे क्र.९८, प्लॉट क्र.११, टाउन प्लॅनिंग स्कीम क्र.१, बोरिवली मधील अंतिम प्लॉट क्र. ३८, यास अनुरूप सी.टी.एस. क्र.५८२, गाव बोरिवली, क्षेत्रफळ सुमारे १२४.७० चौ. मीटर मालमत्ता नोंदणी कार्डनुसार आणि चंदावरकर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई–४०००९२, जिल्हा व नोंदणी उपजिल्हा मुंबई उपनगर येथे स्थित असून, त्याच्या चतुसिमा पुढीलप्रमाणे :

दक्षिणेस वा त्या दिशेने : सी.टी.एस. क्र.५८० व ५८१ असलेला प्लॉट
उत्तरेस वा त्या दिशेने : चंदावरकर रोड
पश्चिमेस वा त्या दिशेने : सी.टी.एस. क्र.५८३ असलेला प्लॉट
पूर्वेस वा त्या दिशेने : सी.टी.एस. क्र.५७९ असलेला प्लॉट

सही/-
धवल एम. संगानी
वकील उच्च न्यायालय
५०२, ५वा मजला, गांजावाला रेसिडेन्सी, गांजावाला लेन, बोरिवली (पश्चिम), मुंबई -४०००९२.
ठिकाण: मुंबई
दिनांक: १८.०४.२०२६



**जाहीर सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येते की, माझी अशिल **सौ.मनीषा अरविंद शर्मा** या सर्व त्या जमीन मालमत्तेच्या भाग व खंडाचे कायदेशीर व पूर्ण हक्कधारक मालक आहेत, जी सर्व्हे क्र.१८६, हिस्सा क्र.१०/बी, क्षेत्रफळ ०.०४.४९ (हे.आर.चौ.मी.) गुंठे ७/१२ उताऱ्यानुसार आणि सी.टी.एस.क्र.२११६, क्षेत्रफळ ४४९.३१ चौ. मीटर, जे ५३७.२७ चौ. यार्डशी समतुल्य आहे, एकूण ७४८.७० चौ.मीटरपैकी मालमत्ता कार्डनुसार, महसुल गाव मालवणी, तालुका बोरिवली, जिल्हा मुंबई उपनगर येथे स्थित असून, त्यावर उभारलेली कच्चा बांधकाम समाविष्ट आहे (यापुढे सदर मालमत्ता म्हणून संबोधण्यात येईल आणि संदर्भित).

माझी अशिल **सौ.मनीषा अरविंद शर्मा या सदर मालमत्ता संभाव्य खरेदीदार श्री.सावळाराम गजाराम पटेल यांना विकणे, हस्तांतरित करणे व सुपूर्द करणे याचा मानस बाळगून आहेत.**

सदर मालमत्तेबाबत कोणास कोणताही कायदेशीर दावा असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यासह खाली सही करणारे वकील श्री.हरिदास पी. सुळ यांना दुकान क्र.३, अक्वारियस तौरस, जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम), मुंबई – ४०००९५** येथे संपर्क साधावा, अन्यथा, असा कोणताही दावा असल्यास तो त्याग केलेला मानण्यात येईल आणि माझे अशिल संभाव्य खरेदीदारासोबत सदर मालमत्तेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील.

सही/-
वकील श्री. हरिदास पी. सुळ
ठिकाण: मुंबई दिनांक: १८.०४.२०२६


# डॉ. शेळके व पत्नीचा अपघाती मृत्यू

पान १ वरून

काही वेळ तिघेही कारमध्ये अडकून होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत त्यांना बाहेर काढले. मात्र डॉ. शेळके आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला होता. जखमी मुलाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉ. शेळके हे अशोक खरात यांचे निकटवर्ती सहकारी होते. ते शिवनिका ट्रस्टमध्ये उपाध्यक्ष होते. हे प्रकरण उघड होताच त्यांनी राजीनामा दिला होता. त्यांची एक शैक्षणिक संस्था होती आणि सिल्व्हर ओक बिल्डर्स हा उद्योग होता. या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीने त्यांची ४ वेळा चौकशी केली होती. त्यामुळे ते या प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार मानले जात होते. शेळके यांच्या मालकीच्या लॉन्समध्येही खरात याची भागीदारी होती. उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या अपघातावर संशय व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, भोंदू अशोक खरात प्रकरणातील एक महत्त्वाची कडी असलेल्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी ही अत्यंत धक्कादायक आहे. जितेंद्र शेळके हा गुन्हेगार होता की नव्हता हे कायद्याने ठरवले असते. शिक्षा कायदा देईल. कुणाचा जीव घेण्याचा अधिकार कुणालाही नाही. पण जी घटना आज घडली ती मात्र एकूण तपास यंत्रणा आणि शासन व्यवस्था या सगळ्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

दरम्यान, भोंदू अशोक खरात प्रकरणात शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांचे निकटवर्ती दिपक लोंढे यांची आज पोलिसांकडून दुसऱ्यांदा कसून चौकशी करण्यात आली. दिपक लोंढे हे शिर्डी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी हजर झाले होते. विशेष म्हणजे, अशोक खरात जिथे अनेक खात्यांचा नॉमिनी आहे त्या समता पतसंस्थेत दिपक लोंढे आणि त्यांच्या पत्नीच्या नावावर चार खाती असल्याची माहिती आहे. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिर्डी पोलिसांकडून दिपक लोंढे यांची सखोल चौकशी केली. अंमलबजावणी संचालनालयाने खरातच्या 'ओकस प्रॉपर्टी डीलर्स अँड डेव्हलपर्स' या कार्यालयावर चौथ्यांदा छापा टाकत साडेतीन तास तपासणी केली. यावेळी काही कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, कार्यालय सील करण्यात आले आहे.


**सार्वजनिक सूचना**

सिद्धेश्वर एसआरए सोसायटी मोजे - बांद्रा, तालुका-अंधेरी CTS ६१८,६१८/१ ते २१ या संस्थेचे सदस्य मृत्यू पत्र न करता स्वर्गीय श्री. शंकर विठोबा जाधव यांचे ०१/०५/२०२० रोजी निधन झाले आहे आणि त्यांचा मोठा मुलगा स्वर्गीय श्री संदिप शंकर जाधव यांचेही १६/०५/२०२० रोजी निधन झाले आहे. त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस पुत्र श्री.सुधाकर शंकर जाधव यांनी सदनिका क्रमांक २०९ साठी सदस्यत्वासाठी अर्ज केला आहे आणि त्या हस्तांतरणात त्यांची आई श्रीमती शांता शंकर जाधव, त्यांची वाहिनी श्रीमती उज्वला संदिप जाधव व त्यांचे पुतणे श्री भूषण संदिप जाधव व श्री जय संदिप जाधव यांनी श्री. सुधाकर शंकर जाधव यांच्या नावे एनओसी आणि रिलीज डीड केले आहे. तरी या मालमत्ता/सदनिका वर कुणाचा दावा किंवा हरकत असल्यास त्यांनी जाहिरात प्रकाशित झाल्यावर १५ दिवसाचा आत संपूर्ण हस्तांतराला तो /ती हरकत लिहून दाखल करू सकतो.

**संपर्क: अध्यक्ष/सेक्रेटरी,**
**सिद्धेश्वर एसआरए को ओप हो सोसायटी,**
सिद्धार्थ नगर, बांद्रा पूर्व, मुंबई ४०००५१ किंवा यांचे वकील
श्री रामबिलास यादव
९६९९८२८९२९
adv.rambilas10@gmail.com


# बळजबरी धर्मांतर हे दहशतवादी कृत्य घोषित करा

पान १ वरून

बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मोर्चे काढून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. मुंबईमध्ये वांद्रे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. नवी मुंबईत कोकण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. तसेच रत्नागिरीतही आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

देशातील अनेक शहरांतून लव्ह जिहाद, वनजमीन, सार्वजनिक जमीन, लष्कर व रेल्वेच्या जमिनींवरील अतिक्रमणे, अन्नपदार्थांचे अपवित्रीकरण, मुस्लिमबहुल भागांमध्ये हिंदूंवर होणारे अत्याचार तसेच अनुसूचित जाती व जमातींतील मुलींचे शोषण अशा घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे असे प्रकार रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली.

# देशात मतदान सक्ती नाही

पान १ वरून - खंडपीठाने म्हटले की, हेतूपुरस्सर मतदानापासून दूर राहणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची आणि मतदान सक्तीचे करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर न्यायालय सुनावणी घेऊ शकत नाही. याचिकाकर्त्यांनी त्यांच्या तक्रारींबाबत संबंधित पक्षांशी संपर्क साधावा. याचिकाकर्त्यांनी अशीही विनंती केली होती की, जे हेतूपुरस्सर मतदानापासून दूर राहतात, त्यांचे सरकारी लाभ रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जावीत. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले की, लोकशाही कायदेशीर दबावापेक्षा जनजागृतीवर अधिक अवलंबून असते. कायद्याच्या राज्याने शासित आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या देशात, जिथे आम्ही ७५ वर्षांहून अधिक काळ आपला विश्वास आणि आत्मविश्वास दाखवला आहे, तिथे प्रत्येकाने मतदान करणे अपेक्षित आहे. जर कुणी मतदान करण्यास जात नसेल, त्यांना आम्ही सक्ती करू शकत नाही. त्यासाठी केवळ जनजागृतीची गरज आहे.


**जाहीर सूचना**

कृपया याची नोंद घ्यावी की, माझे अशिल **श्री.विक्रमसिंह शक्तिसिंह ठाकूर**, राहणार डोंबिवली, ठाणे, यांनी **(१)** सौ. अमृता सतीश आचरेकर आणि **(२)** सुश्री मैथिली सतीश आचरेकर यांच्याशी गाव बोर्ली, तालुका मुरबाड, जिल्हा रायगड येथे स्थित गट क्र.५६, जुना सर्व्हे क्र.१४/२, १४/३बी, एकूण क्षेत्रफळ ६.० गुंठे असलेल्या कृषी जमिनीच्या खरेदीसंदर्भात वाटाघाटी सुरू केलेल्या आहेत, सदर शेतजमीन संबंधित व्यक्तींच्या हक्क, मालकी व हितसंबंधात आहे, म्हणूनच, माझे अशिल सर्वसामान्य जनता तसेच कोणा व्यक्तिस कोणताही दावा किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी त्यासंबंधीचे कागदपत्रांसह लेखी स्वरूपात या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत खाली सही करणाऱ्यांकडे सादर करण्याचे आवाहन करीत आहेत, अन्यथा, कोणताही दावा किंवा आक्षेप नसल्याचे गृहित धरून माझे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पुढे सुरू करतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
डॉ. सचिन पी. दुबे,
वकील, कार्यालय क्र.५१, तळमजला,
न्यू शॉपिंग सेंटर, शासकीय वसाहत,
वांद्रे (पू.), मुंबई-४०००५१.
भ्रमणध्वनी: ०९८१९२६२३३३
दिनांक: १८.०४.२०२६
ठिकाण: मुरबाड, जि. रायगड.



**मध्य रेल्वे**

**दुरुस्ती आणि देखभालीचे काम**

**खुली ई-निविदा सूचना क्र.सीआर-डीआरएम(डब्ल्यू)बीबी-२०२६-२०/१५.०४.२०२६. अ.क्र.१.** कामाचे नाव - दिवा - रोहा :- डीडब्ल्यू-पीएनव्हीएल आणि पीएनव्हीएल-रोहा विभागांमधील समपातळी रेल्वे फाटकांवर रबरयुक्त रस्ता पृष्ठभाग उपलब्ध करून देणे. डीडब्ल्यू-पीएनव्हीएल विभागातील एलसी गेट क्र.१, १ई, ६ आणि पीएनव्हीएल-रोहा विभागातील एलसी गेट क्र.५,११,१३. अंदाजित मूल्य: रु. १८७.४० लाख इरठे: रु. ३,७४,८०० कामाचा कालावधी: १२ महिने. **अ.क्र.२.** कामाचे नाव - डीडब्ल्यू-बीएसआर: डीडब्ल्यू-बीएसआर विभागातील यूपीआरडी आणि डी एनआरडी वरील ब्रिज क्र.६६/१, ७२/१, ७९/३ (६ स्पॅन्स) (१ X १२.२० मी.) आणि ब्रिज क्र.७९/२ (४ स्पॅन्स) (२ X १२.२० मी.) तसेच पीएनव्हीएल-रोहा विभागातील ब्रिज क्र. ८५/३ (१ X १२.२० मी.) (१ स्पॅन) (एकूण = ११ स्पॅन्स) या पुलांवरील स्टील गर्डर्सच्या जागी पीएससी गर्डर्स बसवणे. अंदाजित मूल्य: रु.१५४७.६५ लाख इरठे: रु.३०,९५,३०० कामाचा कालावधी: १८ महिने. **अ.क्र.३:** कामाचे नाव – केजेआरडी–एमबीक्यू, एमबीक्यू–केवायएन: एडीईएन(टी)टीएनए कार्यक्षेत्रांतर्गत एसएसई/पी.वे/टीएनए विभाग आणि एसएसई/पी.वे (डब्ल्यू) केवायएन विभागातील रेल्वे रुळांना लागून असलेल्या सीमाभिंतींवर टीएमसी कचरा संरक्षण व्यवस्था करणे. अंदाजित मूल्य: रु.४७२.३५ लाख इरठे: रु.९४४७०० कामाचा कालावधी: १२ महिने. **अ.क्र.४.** कामाचे नाव - (ए) सीएसएमटी - सीएसएमटी, मुंबई येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील प्रधान संचालक लेखापरीक्षण आणि वरिष्ठ लेखापरीक्षण अधिकारी (०६ क्र.) यांच्या दालनांचे नूतनीकरण. (बी) सीएसएमटी - सीएसएमटी येथील पार्सल इमारत पीएफ-१४/१५ च्या पीसीईई कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या दालनांचे नूतनीकरण.(सी) डब्ल्यूबी - एसएसई/डब्ल्यू/डब्ल्यूबी यांच्या अधिपत्याखाली, एमएस-४ आणि एमएस-५ च्या दरम्यान स्थित सी आणि डब्ल्यू देखभाल कर्मचाऱ्यांच्या कक्षांची (पेंटर कक्ष, बायो-टॉयलेट कर्मचारी कक्ष इत्यादी) दुरुस्ती. अंदाजित मूल्य: रु.१२८.८८ लाख इरठे: रु. २५७८०० कामाचा कालावधी: १२ महिने. **अ.क्र.५.** कामाचे नाव - (ए) डीकेआरडी - एसएसई/डब्ल्यू/डब्ल्यूबी यांच्या अखत्यारीतील मास्टर चाळ रेल्वे कॉलनी आणि कॉटन प्रेस वेअरहाऊस यांच्या दरम्यानच्या कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती. (बी) सीएसएमटी - प्लॅटफॉर्म क्र.०७, सीएसएमटी येथील जीर्ण झालेल्या वाहतूक लेखा इमारतीची तातडीची संरचनात्मक दुरुस्ती. अंदाजित मूल्य: रु.१८७.४८ लाख इरठे: रु.३७५००० कामाचा कालावधी: १२ महिने.**अ.क्र.६**. कामाचे नाव - सीएसएमटी-सीएलए विभागात फलाटांवर नवीन सीओपी ची तरतूद आणि खराब झालेल्या व्हॅली गटर्स व डाऊनटेक पाईप्स ची बदली. (ए) सीएसएमटी येथील पीएफ-१ ते पीएफ-३ वरील उंच ट्रसच्या सीओपी भागातील गळक्या छताच्या पत्र्यांची, व्हॅली गटर आणि खाली जाणाऱ्या नळांची दुरुस्ती. अंदाजित मूल्य: रु.१७०.०९ लाख इरठे: रु.३४०२०० कामाचा कालावधी: १२ महिने. **अ.क्र.७.** कामाचे नाव - सीएसएमटी-सीएलए विभागात फलाटांवर नवीन सीओपी बसवणे, तसेच खराब झालेले व्हॅली गटर्स आणि डाऊन-टेक पाईप्स बदलणे. (अ) एमएसडी – एसएसई (डब्ल्यू)/डब्ल्यूबी यांच्या अखत्यारीतील मस्जिद स्थानकावरील आच्छादन नसलेल्या भागासाठी नवीन सीओपीचीतरतूद करून देणे. (बी) एसएसई (डब्ल्यू)/डब्ल्यूबी यांच्या अधिपत्याखाली, सँडहर्स्ट रोड येथील फलाट क्र.१,२,३ व ४ वरील गळक्या व गंजलेल्या सीओपी पत्र्यांची आणि व्हॅली गटर ची दुरुस्ती. अंदाजित मूल्य: रु.२८६.१५ लाख इरठे: रु.५७२३०० कामाचा कालावधी: १२ महिने. **१)** उपरोक्त निविदेची अंतिम तारीख व वेळ: अ.क्र.१, २, ३, ४ आणि ५ करिता दिनांक ०५.०५.२०२६ रोजी १५.०० वा. पर्यंत; तसेच अ.क्र.६ आणि ७ करिता दिनांक १२.०५.२०२६ रोजी १५.०० वा. नंतर उघडल्या जातील. **२)** इच्छुक निविदाकारांना विनंती करण्यात येते की, निविदांचे तपशील आणि शुद्धीपत्रक असल्यास पाहण्यासाठी त्यांनी www.ireps.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. ३) निविदाकार सदर ई-निविदेमध्ये केवळ www.ireps.gov.in या वेबसाईटद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच सहभागी होऊ शकतो; ई-निविदेच्या अनुषंगाने व्यक्तिचलित निविदा सादर करण्यास परवानगी नाही. जर निविदा व्यक्तिचलितपणे सादर केली गेली, तर ती उघडली जाणार नाही अथवा विचारात घेतली जाणार नाही. ४) निविदा बोली सुरक्षा ही ई-पेमेंट गेटवेद्वारे रोख स्वरूपात जमा करावी, किंवा भारतातील एखाद्या शेड्युल्ड कमर्शियल बँकेचा बँक हमी रोखा म्हणून सादर करावी, अथवा निविदा दस्तऐवजांमध्ये नमूद केल्याप्रमाणे सादर करावी. ५) अधिक चौकशीसाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मध्य रेल्वे यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२२-६७४५५३२३ वर संपर्क साधावा. ६) ही निविदा दिनांक १६.९.२०१७ च्या जाहीर खरेदी धोरण आदेश २०१७ चे पालन करते. निविदांचे संपूर्ण तपशील www.ireps.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. निविदांचे संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मुंबई सीएसएमटी यांच्या कार्यालयातील 'सूचना फलकावर' देखील उपलब्ध आहेत.

58

सुरक्षित प्रवास करा; फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.



**जाहीर सूचना**

आमचे पक्षकार **श्री. मुकुंद विनायक विनोद, श्री. यशवंत विनायक विनोद, श्री. गणेश विनायक विनोद** - राः विनोद निवास, महर्षी कर्वे रोड, शुभंकरोती हॉल जवळ, नौपाडा, ठाणे यांनी दिलेल्या माहिती व सुचनेनुसार पुढीलप्रमाणे जाहीर सुचना देण्यात येते की, खाली नमुद केलेल्या परीशीष्टातील मिळकत आमचे पक्षकार यांचे मालकीची आहे. आमचे पक्षकार यांचे तर्फे खाली नमुद केलेल्या परीशीष्ट अ मधील मिळक्तीचे विकसन करार **विराया बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स** यांचे बरोबर करावयाचे ठरवले आहे व महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) यांचेकडे सदर मिळक्तीवरील विकास प्रकल्प नोंदणी करणे यासाठी तसेच मालकी हक्काचे निर्वेधतेबाबत चौकशी करण्यात येत आहे. त्यानुषंगाने सदर मिळकतीबाबत कोणाचेही विक्री, आगाऊ विक्री, खरेदी, अदला-बदल, देवाणघेवाण, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, गहाणखत, कुळवहीवाट, संमती, परवानगी, हस्तांतरण, धारणाधिकार, बोजा, कुलमुखत्यारपत्राव्दारे हक्क ताबा, परीरक्षण, न्यास, सुविधा अधिकार, मृत्युपत्र, बक्षिस, धारणाधिकार (लिन), वारसा हक्क, हिस्सा, भेट, रस्ता, वाट अगर हद्दीबाबत अथवा अन्य स्वरूपाचा काही हक्क वाद असेल अथवा अन्य क्शाहीप्रकारे कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरूपाचे हितसंबध अथवा इतर हक्क असलेल्या किवा असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने खाली सही करणार यांजकडे खाली दिलेल्या पत्यावर लेखी स्वरूपात आणि पुराव्याच्या प्रमाणित नकलांसह सदर मिळकती मधील आपल्या दाव्याबाबत किंवा हक्काबाबत ही नोटिस प्रसिध्द झालेल्या दिवसापासुन पुढील १४ दिवसात कळविणे आवश्यक आहे. अन्यथा सदर मिळकतीमधील कुठल्याही व्यक्तीचे हक्क व कुठलेही हितसंबंध नाहीत असे समजण्यात येईल व आमचे पक्षकाराचे सदर मिळक्ती मधील मालकी हक्कनिर्वेध असल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात येईल.

**परिशिष्ठ-अ**

मिळकतीचे वर्णनः- मौजे ठाणे, येथील खालील नमूद भूखंड व त्यावरील विनोद निवास, तळमजला (स्टील्ट) आणि ३ वरचे मजला इमारत, महासूली गाव-नौपाडा, राममारूती रोड जवळ, शुभंकरोती हॉल शेजारी, महर्षी कर्वे रोड, ता. व जि.ठाणे

| नगर भुमापन क्रं. | टिका क्रं. | क्षेत्रफळ (चौ.मी) |
|---|---|---|
| २६ क | १६ | १७८६-०१ पैकी ५०८ |

सही/-
**ॲड. राजेश मुधोळकर**
पत्ता-२०२,२०३ आनंद पॅलेस, टेंबीनाका,भवानी चौक, ठाणे

# पेटीएम आता भारतीय मालकीची कंपनी

**मुंबई-** एक प्रमुख भारतीय डिजिटल पेमेंट आणि ई- कॉमर्स व्यासपीठ असलेली वन ९७ कम्युनिकेशन लिमिटेडची 'पेटीएम' कंपनी आता भारतीय मालकीची बनली आहे. एप्रिल २०२६ च्या अहवालानुसार, कंपनीतील देशांतर्गत भारतीय हिस्सा ५०.३ टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे, तर परदेशी मालकी ४९.४ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. सध्या पेटीएममध्ये म्युच्युअल फंड, विमा कंपन्या आणि इतर देशांतर्गत संस्थांनी आपला हिस्सा ५०.३ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांची भागीदारी २३.१ टक्क्यांवर पोहोचली आहे. ती मागील वर्षी १४ टक्के होती. विजय शेखर शर्मा हे पेटीएमचे संस्थापक असून, कंपनीचे मुख्य कार्यालय नोएडा येथे आहे.




# महिला आरक्षण व भाजपा

**आपल्याला खाज आहे हिमालयाच्या मदतीला धावून जाण्याची. हिमालय आपल्याला हिंग लावून विचारत नाही. रामाच्या नावावर हिंदुत्वाची दुकानदारी सुरू झाल्यावर सगळा गायपट्टा आपल्या घरात शिरला आहे. शिवाजी महाराजांनी केलेल्या दक्षिण दिग्विजयाला नंतर खीळ बसली.**



**दीपक पवार**

**पेशव्यांच्या** काळात आपण दिल्लीत गेलो, अटकेपार गेलो, पण सोबत आपली भाषा नेली नाही. तेव्हापासून आजतागायत दिल्लीचं तख्त राखण्यात, आतातर दिल्लीच्या नावाखाली गुजरातचे जोडे राखण्यात आपले निलाजरे अभिजन धन्यता मानू लागलेत. उत्तरेतले लोक आपल्याला त्यांची वसाहत मानतात. दक्षिणेशी आपला सांधा जुळला नाही.

आपण भौगोलिकदृष्ट्या पश्चिमेत आहोत, पण ते नावापुरतं. आता आपला कस लागला आहे. रेवंत रेड्डी, स्टालिन, पिनरई विजयन यांनी मतदारसंघ पुनर्रचनेविरूद्ध लढायची सुरुवात केली आहे.

आमचे लोक काय करताहेत?

उद्धव ठाकरेंनी मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रश्न तूर्त स्थगित करावा असं म्हटलंय.तिकडे स्टॅलिनची सविस्तर टिपणं, युक्तिवाद प्रसिद्ध होतात, त्यांची आयटी विंग आक्रमक भूमिका घेते. शिवसेना पक्षप्रमुखांनी त्यांची भूमिका एवढी अल्पाक्षरी मांडण्यात काय हशील आहे?

सेनेच्या किशोरी पेडणेकरांसारख्या बालबुद्धी प्रतिनिधी चित्रा वाघांना मिठी मारून मिस कॉल खेळत बसतात. चित्रा वाघ या मायावी आहेत. तुमच्या पक्षातल्या आणि समाजातल्या स्त्रियांना गंडवण्यासाठी त्या पीआर कॅम्पेन चालवताहेत हे तुम्हाला कळत नाही. प्रियंका चतुर्वेदींना तर चित्रा वाघांच्या प्रेमाचं भरतं आलंय. तुम्हाला एक टर्म देऊनच तुमच्या पक्षाचं चुकलंय हे त्यातनं कळतंय.

शर्मिला ठाकरेंनी सुद्धा वाघ ताईंचा खेळ उघडा पाडायला हवा होता. सुप्रिया सुळेंना मधमाश्यांच्या पोळ्याच्या राष्ट्रीय प्रश्नातून वेळ मिळाला तर त्या यावरही बोलतील आणि तोवर त्या मविआ, इंडिया आघाडीतच असतील असं गृहित धरूया.

शरद पवार, राज ठाकरे या मंडळींनी आपला स्पष्ट विरोध व्यक्त केला पाहिजे. समाजवादी, डावे, आंबेडकरवादी सगळ्यांचीच ती जबाबदारी आहे. कुणी सांगायची, आमंत्रण द्यायची वाट बघू नका. महिला आरक्षणाच्या बुरख्याआड दडून मतदारसंघाची फेररचना हा भाजपाच्या व्यापक कारस्थानाचा भाग आहे. कोणत्याही परिस्थितीत ते यशस्वी न होऊ देणं ही राज्यातल्या आणि देशातल्या विरोधकांची घटनादत्त जबाबदारी आहे.

ही वेळ दिल्लीचं तख्त अंगावर घेण्याची आणि महाराष्ट्रधर्मासाठी लढण्याची आहे. जे मोक्याच्या वेळी शेपूट घालतील आणि पाठीला पाय लावून पळतील त्यांची योग्य ती नोंद इतिहास घेईलच.

जे भयावर मात करून मराठीकारणासाठी लढतील आणि पाय रोवून राहतील तेच या गलितगात्र वर्तमानातून महाराष्ट्राला बाहेर काढतील. ही निर्णायक वेळ आहे. इथे कोणी कुणाचा मार्गदर्शक, वाटाड्या, सल्लागार नाही. मुद्दा मतदारसंघांच्या फेररचनेचा असेल, महाराष्ट्राच्या त्रिभाजनाचा असेल, मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी संस्कृती यांच्या नव्या सांस्कृतिक राजकारणाचा असेल, हीच वेळ आहे नवा विचार घेऊन ठोस कृती करण्याची.

# दोन दिवसांत उत्तर देऊ! 'नॉट रिचेबल' सहर यांचे वडील मुंब्रा पोलीस ठाण्यात

■ ठाणे

**ठाणे** महापालिकेतील एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांचे दोन दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेले वडील युनूस शेख यांनी आज अचानक मुंब्रा पोलीस ठाण्यात हजेरी लावली. सुमारे १५ ते २० मिनिटे पोलिसांशी चर्चा केल्यानंतर बाहेर पडताना त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावत 'करारा जवाब मिलेगा, दोन दिवसांत आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू,' असा इशारा दिला.

युनूस शेख म्हणाले की, दोन दिवसांत आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू. करारा जवाब मिलेगा. आमच्यावरचे सर्व आरोप चुकीचे आहेत. मुलगी मोठी होत आहे म्हणून काही जणांचा जळफळाट होत आहे. हा सगळा प्रकार केवळ राजकीय स्टंट आहे. सहर शेख यांनी बनावट जात प्रमाणपत्र सादर करून महापालिका निवडणूक लढवल्याची तक्रार सिद्दिकी अहमद यांनी दाखल केली आहे. या प्रकरणानंतर सहर शेख आणि युनूस शेख गेल्या दोन दिवसांपासून संपर्कक्षेत्राच्या बाहेर असल्याची चर्चा होती. मात्र, सहर काल त्या मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर क्रिकेट सामना पाहताना दिसल्या. त्याचा व्हिडिओ त्यांनी स्वतः इन्स्टाग्रामवर शेअर केला. त्यात त्यांनी स्टोरीमध्ये सामन्याच्या व्हिडिओसह गेम ओव्हर असेदेखील लिहिले. तसेच तूने ना जाना तेरे जाने से क्या क्या हुआ, कितनी कहानी बनी कितना तमाशा हुआ.. जाने तू कैसी होगी..असे गाणेही स्टोरीला लावले होते.

# भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करारावर २७ एप्रिलला स्वाक्षरी

■ नवी दिल्ली

**भारत** आणि न्यूझीलंड हे दोन्ही देश २७ एप्रिल रोजी ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करणार आहेत. पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार ५ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणे आणि १५ वर्षांत २० अब्ज डॉलरची गुंतवणूक आकर्षित करणे हा या करारामागील मुख्य उद्देश आहे. या करारामुळे भारतीय निर्यातीला न्यूझीलंडमध्ये १०० टक्के शुल्कमुक्त प्रवेश मिळणार आहे.

गेल्या वर्षी २२ डिसेंबर रोजी दोन्ही देशांनी या करारासाठीची बोलणी पूर्ण झाल्याची घोषणा केली होती. दिल्लीतील भारत मंडपम येथे होणाऱ्या 'भारत-न्यूझीलंड बिझनेस फोरम'च्या बैठकीनंतर या करारावर स्वाक्षरी केली जाणार आहे. या करारानुसार, भारताच्या १०० टक्के निर्यातीला न्यूझीलंडमध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. भारत न्यूझीलंडच्या ९५ टक्के उत्पादनांवरील आयात शुल्क कमी करेल किंवा रद्द करेल.

# सांगलीचा पारा ४० अंशांवर चार दिवस उष्णतेची लाट

■ सांगली

**उन्हाच्या** वाढत्या तडाख्यामुळे सांगली जिल्ह्यातील जनजीवनावर परिणाम झाला आहे. जिल्ह्याचा पारा ४० अंशांवर पोहोचला आहे. सकाळी नऊ वाजल्यापासूनच तीव्र झळा बसू लागल्याने लोक उकाड्याने हैराण होत आहेत. लोक घराबाहेर पडायचे टाळत असल्याने दुपारच्यावेळी शहरातील रस्त्यांवर शुकशुकाट दिसत आहे. पुढील चार दिवस उन्हाची तीव्रता राहण्याचा अंदाज आहे.

तज्ज्ञांच्या मते, उत्तर आणि उत्तर-पश्चिम भागाकडून येणाऱ्या उष्ण व कोरड्या वाऱ्यांमुळे तापमानात वाढ झाली आहे. हवेतील ओलावा कमी झाल्यामुळे सूर्याची किरणे जमिनीपर्यंत थेट पोहोचत आहेत. एल निनोचा प्रभाव आणि सिमेंटच्या जंगलामुळे तापमानात वेगाने वाढ होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील चार दिवस सांगलीकरांना दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे. तापमानाचा पारा ४१ अंशांपर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे.

# ड्रग रोखण्याची ताकद सरकारमध्ये नाही का? मनसे नेते अमित ठाकरे यांचा संतप्त सवाल

■ पुणे

**पुणे,** नाशिक आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांमधील ड्रग प्रकरणांवरून मनसे नेते अमित ठाकरे यांनी सरकारवर ताशेरे ओढले आहेत. त्यांनी असा सवाल केला की, सगळ्या शहरांत ड्रग सापडत आहेत, विकले जात आहेत. शहरात ड्रग येतात कुठून? हे थांबवण्याची ताकद सरकारमध्ये नाही का?

अमित ठाकरे पुढे म्हणाले की, पोलिसांना मोकळेपणाने कारवाई करू द्या. आपल्या शहरांना कुठे आणून ठेवले आहे? ड्रग मोठ्या प्रमाणात येतात, हे भीषण आहे. याचे



आकडे सरकारकडे येत नाहीत का? असे अनेक आरोपी आहेत जे ड्रग विकतात. अमली पदार्थांचा व्यापार दिवसेंदिवस वाढत असून, त्याची भीषणता आता उघडपणे दिसू लागली आहे. ज्या प्रमाणात ड्रग विकले आणि खरेदी केले जात आहेत, ते खरोखरच धक्कादायक आहे. या वाढत्या प्रवृत्तीमुळे विशेषतः तरुण पिढीवर गंभीर परिणाम होत आहेत. गंभीर बाब म्हणजे शाळांच्या परिसरातही अमली पदार्थांची विक्री होत आहे. शाळांच्या जवळच बेधडकपणे ड्रग विकली जातात, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार असलेल्या यंत्रणांनी या प्रकाराकडे दुर्लक्ष केले.

# नवी मुंबई परिवहन कर्मचाऱ्यांच्या ठोक मानधनात ७ हजारांची वाढ

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महापालिकेच्या एनएमएमटी अर्थात परिवहन उपक्रमात ठोक मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अखेर वेतनवाढ मंजूर करण्यात आली आहे. परिवहन समितीच्या बैठकीत १,३९८ कर्मचाऱ्यांच्या मानधनात सात हजारांची सरसकट वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वेतनवाढीमुळे एनएमएमटी व पर्यायाने महापालिकेच्या तिजोरीवर वर्षाकाठी कोट्यवधींचा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

परिवहन समितीच्या बैठकीत सदस्य राहुल शिंदे यांनी ठोक मानधनावरील

**प्रत्येकी ७ हजारांची सरसकट वाढ मंजूर**

कर्मचाऱ्यांना १० हजार रुपये मानधनवाढीचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र प्रशासनाने एनएमएमटीच्या सध्याच्या आर्थिक स्थितीचा दाखला देत, इतका मोठा आर्थिक भार पेलणे कठीण असल्याचे सांगितले. यावर सदस्य व प्रशासन यांच्यात सविस्तर चर्चा झाली व अखेर मध्यम मार्ग म्हणून ७ हजारांच्या सरसकट वाढीवर सर्वांचे एकमत होऊन तो मंजूर करण्यात आला. या वेतनवाढीमुळे चालकांना आता ३२,५०० रुपये, तर वाहकांना ३१,५०० रुपये मानधन मिळणार आहे. यामुळे एनएमएमटी उपक्रमावर दरमहा सुमारे ९३ लाखांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार आहे.

# गोकुळ प्रकरणातील वादग्रस्त सहाय्यक निबंधकाची बदली

■ कोल्हापूर

**गोकुळ** दूध संघाशी संबंधित वादग्रस्त प्रकरणात सहाय्यक निबंधक सुजय कदम यांची अवघ्या १५ दिवसांतच तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

सुजय कदम यांची नुकतीच दुग्ध विभागातील सहाय्यक निबंधक (दुग्ध) पदावर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, अनेक संस्थांना बेकायदेशीररित्या क्लीन चिट दिल्याचा आरोप त्यांच्यावर झाल्यानंतर त्यांची बदली करण्यात आली. चंदगडचे भाजपा आमदार शिवाजी पाटील यांनी या संदर्भात केलेल्या मागणीला यश आल्याचे मानले जात आहे. दरम्यान, कदम यांची बदली जाहीर झाल्यानंतरही ते कार्यालयात आल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे. गोकुळ प्रकरणावरून भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होत आहे. यापूर्वी दुग्ध विभागातील सहाय्यक निबंधक प्रदीप मालगावे यांचीही तडकाफडकी उचलबांगडी करण्यात आली होती.

# गुवाहाटी न्यायालयात अर्ज करा खेरांना सुप्रीम कोर्टाचा झटका

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** नेते पवन खेरा यांच्याविरुद्ध आसाम पोलिसांनी दाखल केलेल्या मानहानी आणि फसवणुकीच्या प्रकरणात, तेलंगणा उच्च न्यायालयाने त्यांना यापूर्वी मंजूर केलेला अटकपूर्व ट्रान्झिट जामीन वाढवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. तुम्ही आसाममधील न्यायालयात याचिका दाखल करा. न्यायालय त्यावर सुनावणी घेईल, असे खंडपीठाने त्यांना म्हटले.

पवन खेरा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीकडे तीन देशांचे पासपोर्ट आहेत, असा आरोप पवन खेरा यांनी जाहीरपणे केला होता.

त्यानंतर आसाम पोलिसांनी पवन खेरा यांच्या विरोधात आसाम पोलिसांनी मानहानी, फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपांखाली फौजदारी गुन्हा दाखल केला होता. त्याविरोधात खेरा यांनी तेलंगणा उच्च न्यायालयात जाऊन १० एप्रिल रोजी अटकपूर्व जामीन मिळवला होता.

# नवनीत राणाची प्रसिद्धीसाठी घाई हिंदू मुलींवरच अत्याचाराचा दावा

■ अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील परतवाडात एका मुलाने आमच्या मुलींवर अत्याचार करत त्याचे १५० हून अधिक व्हिडिओ काढले आहेत. हे व्हिडिओ सर्व सोशल मीडियावर व्हायरल केले. त्यामध्ये एकही व्हिडिओ बुरख्यावाल्याचा नाही त्या आमच्या मुली आहेत, असा आरोप आज माजी खासदार नवनीत राणा यांनी केला. मात्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी या प्रकरणातील सर्व मुली मुस्लीम समाजातील असून, नवनीत राणा यांनी या प्रकरणाला धार्मिक रंग

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दिल्याचा आणि पीडित मुलींची ओळख उघड केल्याचा ठपका ठेवत, त्यांच्यावर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणासंदर्भात पत्रकार परिषद घेत नवनीत राणा यांच्यावर हल्लाबोल केला. प्यारे खान म्हणाले की, नवनीत राणा या महाराष्ट्राला आणि देशाला उद्ध्वस्त करू इच्छित आहेत. हिंदू मुलांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत असून, यातून हिंदूंना संकटामध्ये टाकत आहेत. त्यांनी विचार केला पाहिजे. या प्रकरणात कोणत्याही हिंदू मुलींचा समावेश नाही, हे मला नागपूरमध्ये समजते.

# मुंबईत १ मे पासून १० टक्के पाणीकपात

■ मुंबई

**यंदा** पावसात घट होण्याची शक्यता व प्रचंड उष्णतेमुळे धरणांतील पाणीसाठा झपाट्याने घटत असल्याने मुंबईत १ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. पालिकेच्या जल अभियंता विभागाने यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे सादर केला असून, पाणीसाठा किमान पुढील तीन महिने पुरवता यावा यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सध्या मुंबईला दररोज सुमारे ३,९५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. मात्र, १० टक्के कपात लागू झाल्यानंतर हा पुरवठा कमी होऊन सुमारे ३,५५० दशलक्ष लिटरपर्यंत खाली येईल. म्हणजेच दररोज सुमारे ४०० दशलक्ष लीटर पाण्याची कपात होणार आहे.






# केदारनाथ व बद्रीनाथ मंदिरात मोबाईल बंदी

**यावर्षीची चारधाम यात्रा रविवार १९ एप्रिलपासून सुरू होणार आहे. गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे भाविकांसाठी खुले केल्यानंतर बद्रीनाथ आणि केदारनाथ मंदिरांमध्ये प्रवेश दिला जाईल. यंदा या दोन्ही मंदिरात दर्शनासाठी प्रवेश करताना भाविकांना सोबत मोबाईल फोन नेण्याची परवानगी नसेल.**

■ डेहराडून

**गर्दीचे** व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्याच्या उद्देशाने मोबाईल वापरावर बंदी घालण्यात आली आहे. जर एखादा भाविक मंदिराच्या परिसरात मोबाईल फोन घेऊन आला, तर त्याला आपला फोन जवळच असलेल्या एका विशिष्ट कक्षात जमा करावा लागेल. शिवाय, यावर्षी मंदिराच्या परिसरात व्हिडिओ बनवणे किंवा 'रील्स' चित्रीत करणे यावर कडक बंदी असेल.

यावर्षीच्या चार धाम यात्रेची सुरुवात १९ एप्रिल रोजी होणार आहे. या कालावधीत गंगोत्री



आणि यमुनोत्री धामचे दरवाजे भाविकांसाठी खुले होतील आणि त्यासोबतच या तीर्थयात्रेचा अधिकृत प्रारंभ होईल.

# पाण्याच्या टँकरची धडक शेतकरी महिला जागीच ठार

■ नाशिक

**रस्त्यावर** पाणी मारणाऱ्या टँकरच्या धडकेत एका शेतकरी महिलेचा जागीच मृत्यू झाला. दिंडोरी तालुक्यातील नाशिक-अकराळे फाटा रस्त्यावरील ढकांबे टोल नाक्याजवळ काल सायंकाळी ही हृदयद्रावक घटना घडली. मृत महिलेचे नाव कमल देविदास बोडके (५५) असे आहे. या मार्गावर सध्या रस्ते रुंदीकरणाचे काम सुरू आहे. सायंकाळच्या सुमारास धूळ उडू नये, म्हणून रस्त्यावर पाणी मारण्याचे काम टँकरद्वारे सुरू होते. यावेळी चालकाचा ताबा सुटल्याने टँकरने कमल बोडके यांना जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# ताडदेवमधील साईलीला इमारतीला भीषण आग

■ मुंबई

**मुंबईतील** ताडदेव परिसरातील 'साई लीला' या रहिवासी इमारतीला आज भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील एका घरात आग लागली होती. त्या घरातून मोठ्या प्रमाणावर धूर बाहेर पडत होता आणि तो वरच्या मजल्यांकडे पसरत होता. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या व घरात अडकलेल्या दोघांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. संपूर्ण इमारत रिकामी करण्यात आली. सुरुवातीला अग्निशमन दलाच्या दोन गाड्या पोहोचल्या होत्या. मात्र परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन आणखी गाड्या पाचारण करण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या सुमारे तासाभराच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.